सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

# सहकार सुगंध

ISBN
978-81-940842-0-4

• पुणे • वर्ष : २१ • अंक ०१ • एप्रिल २०२५ • पृष्ठे ४० • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी




## भारतीय रिझर्व्ह बँकेचा ९०वा वर्धापनदिन मुंबईत साजरा

STABILITY
TRUST
GROWTH

## भारतातील डिजिटल बँकिंगचा जगभरात डंका : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू




## आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष गृहनिर्माण संस्थांचा स्वयंपुनर्विकास सोपा होणार...


## सहकार भारती व स्वयंसिद्धा फौंडेशनच्या वतीने मीरा भाईंदर येथे महिला दिन साजरा








|| जय श्रीराम ||
सर्व नागरिकांना
श्री रामनवमी च्या
हार्दिक शुभेच्छा
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
तुमच्या सेवेत सदैव तत्पर
LOCKERS सुविधा
SMS अलर्ट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
₹ 2200 कोटींच्या वर व्यवसाय
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सेवा सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
शुभेच्छुक
सौ. निलिमा बावणे
अध्यक्ष
सौ. सारिका पेंडसे
उपाध्यक्ष
संस्थेच्या सर्व संचालक मंडळ, पदाधिकारी व कर्मचारी वृंद
24x7 मोबाईल बँकिंग
आता
NEFT
RTGS
IMPS
UPI
आपल्या मोबाईल द्वारे कुठेही, कधीही
बँकिंग व्यवहार तुमच्या मोबाईल वर
डिजिटल बँकिंग सुविधा
Cash Less बँकिंग व्यवहार
BANKING P.O
90 DAYS TRAINING
BANKING POINT PROGRAMME P.O.
A Bridge of Banking Career
Join The Dharampeth Mahila Society Probationary Officer Programme P.O.
Enroll Now & Grab The Opportunity
8055026129
100% Placement Guarantee*
दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
आपला परिवार, आपली संस्था !
30 वर्ष विश्वासाचे
मुख्य कार्यालय : प्लॉट नं 42-अ सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-440010.
फोन : 0712-2220716, 2524337, 2520303



राजर्षी शाहू
मल्टीस्टेट
र.नं. 819
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. लि बुलडाणा
ISO 9001:2015 मान्यता प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून बँको पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून मल्टीस्टेट फेडरेशनच सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
आधारवड
रा.ल. उपारव्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
गुढी उभारु आनंदाची, समृद्धीची, आरोग्याची, समाधानाची आणि उत्तुंग यशाची...
आपल्याला व आपल्या कुटुंबीयांना गुढीपाडवा व श्री राम नवमीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
Shahu Pay
खातेदारांना पेपरलेस सुविधा देणारी राजर्षी शाहू एकमेव पतसंस्था
शाहू पे द्वारे कोणत्याही शाखेमध्ये जमा स्लीप किंवा विड्रॉल फॉर्म न भरता QR कोड स्कॅन करून व्यवहार करता येईल.
MAHAVITARAN
MSEB
वीज बिल भरणा केंद्र
संस्थेची वैशिष्ट्ये
1. एकूण 69 शाखेचा विस्तार
2. 800 कोटींचा व्यवसाय
3. 100000 सभासद संख्या
4. 'शाहू पे' हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
5. महिला बचत गटाच्या माध्यमातून 35 हजार महिलांना 125 कोटी रु. चे कर्ज वाटप
› शाहू पे
› मोबाईल बँकिंग
› नेट बँकिंग
› डोअरस्टेप बँकिंग
› RTGS
› NEFT
अपेक्षेपेक्षा अधिक लाभ देणारी विश्वसनीय संस्था
अखंड वाढ आपल्या गुंतवणुकीची..!
दाम दुप्पट ठेव योजना
सोने तारण कर्ज
वेअर हाऊस कर्ज
अल्पबचत कर्ज
वाहन तारण कर्ज
बचत गट कर्ज
मा.संदीप शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू मल्टीस्टेट
अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
राजर्षी शाहू विशेष लखपती ठेव योजना
> २४५०/- रू. प्रतिमाह ३६ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> १७००/- रू. प्रतिमाह ४९ महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> १३५०/- रू. प्रतीमाह ६० महिने भरा मिळवा रु.१,००,०००/-
> ६५०/- रू. प्रतीमाह ६२ महिने भरा मिळवा रु.५०,०००/-
ठेवींचे आकर्षक व्याजदर
१ महिना ते ६ महिने पर्यंत ९.५० %
७ महिने ते १२ महिने पर्यंत १०.५०%
१३ महिने ते पुढे ११ %
सोने तारण कर्ज फक्त
10%
व्याजदरामध्ये उपलब्ध
नियम व अटी लागू
Missed Call
Balance check सुविधा
7877778870
राजर्षी शाहू मल्टीस्टेट
COMING SOON
WhatsApp Banking
New Channel for the New Generation
राजर्षी शाहू मल्टीस्टेट
सौ.मालती संदीप शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
+९१ - ९५२८४९०४९०


netwin
Ideas to Life
एकमेव उद्देश... ग्रामीण बँकिंगला
भारताच्या अर्थव्यवस्थेत समाविष्ट करणे.
₹ १६.६७ कोटी
प्रति महिना IMPS व्यवहार
₹ २५० कोटी
प्रति महिना उलाढाल
३ लाख
व्यापारी डिजिटल
व्यवहाराचे भागीदार
९,०७,१६८
सरासरी मासिक
UPI व्यवहार
NetPay-UPI
QR Code
Certification's
ISO
CMMI
TIER3 DATA CENTER
CISA
अधिक माहिती साठी संपर्क करा
०२५३ ६६५ १५००
sales@netwinindia.in
www.netwin.in



Janaseva Sahakari
Bank Ltd. Hadapsar,
Pune
आव्हान ...
ग्लोबल वॉर्मिंगचे,
पर्यावरण संवर्धनासह
लाभ मिळवा सेव्हिंगचे !
रुफटॉप सोलर इलेक्ट्रिक, सोलर वॉटर हिटरसाठी
जनसेवा बँक सोलर कर्ज
अल्प प्रोसेसिंग फी
किफायतशीर व्याजदर
सुटसुटीत कर्ज प्रक्रिया
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
www.janasevabankpune.net

VISUAL
INFOSYSTEMS PRIVATE LIMITED
A core banking software solutions

3000+ SATISFIED CLIENTS

# व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.

A Core Banking Software Solutions

छत्रपती संभाजीनगर



संपूर्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अग्रेसर असलेले
सर्वाधिक पसंतीचे कोअर बँकिंग सॉफ्टवेअर

* ऑडीटसाठी लागणारे सर्व रिपोर्ट उपलब्ध
* डोअर स्टेप बँकिंग मोबाईल ॲप
* क्रेडिट स्कोअर रिपोर्ट * क्यू. आर. कोड कलेक्शन
* आधार/पॅन पडताळणी * इंटरनेट बँकींग
* ऑनलाईन मोबाईल बँकींग
* मॅनेजमेंट मोबाईल ॲप
* मोबाईल ॲप फॉर बँक स्टाफ
* कस्टमर ॲप
* रिकव्हरी ॲप

**CERTIFICATIONS:**
VAPT & CERT In Certification for Web and Android App Certified by TUV-SUD ISO 9001:2015 ISO/IEC 27001:2013

आजच आपल्या बँक, पतसंस्था, मल्टीस्टेट, कर्मचारी सोसायटी, एन बी एफ सी (NBFC) मध्ये कोअर बँकिंग सॉफ्टवेअर सुरु करा.

Contact Us

कॉर्पोरेट ऑफिस :
व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.
अ-२४-५, चिखलठाणा औद्योगिक क्षेत्र,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००६

हेड ऑफिस :
व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.
थर्ड फ्लोर, मालन प्लाझा.
दुर्गा माता मंदिरा जवळ, आकाशवाणी रोड,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००५

+91 9423000202 +91 9209000096
+91 9763878000 +91 8080342437
+91 8080762775 +91 9763873000
+91 9545002127 +91 9730070680

Email : info@visualinfosystems.in website : www.visualinfosystems.com

|| बिना संस्कार नहीं सहकार । बिना सहकार नहीं उद्धार ||

# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

एप्रिल २०२५ (वर्ष २१, अंक ०१)

# अनुक्रम


- देशाच्या आर्थिक भविष्याला आकार व स्थिरता आणण्यात आरबीआयची भूमिका महत्त्वपूर्ण – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ........ ०९
- देशाचा जीडीपीचा दर वाढण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता : आरबीआय संचालक सतीश मराठे यांची अपेक्षा ........ १०
- सहकारी गृहनिर्माण संस्थांचा स्वयंपुनर्विकास सोप्या पद्धतीने व्हावा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ... ११
- एआय तंत्रज्ञानामुळे कमी पाण्यात ऊसाचे उत्पादन वाढणे शक्य ........ १२
- पारदर्शी व्यवहार हा सहकाराचा आत्मा – महामंत्री विवेक जुगादे ........ १४
- सहकारी बँकांनी सायबर सुरक्षतेबाबत सक्षम यंत्रणा कार्यान्वित करावी – आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा ........ १५
- दूध दरवाढीचे गणित ........ १६
- पतसंस्थांचे करारनामे : आर्थिक सुरक्षिततेचा महत्त्वपूर्ण दुवा ........ १७
- तुमची माहिती, तुमचा हक्क : डिजिटल जगात सुरक्षिततेचा नवा मार्ग व आव्हाने ........ १८
- सहकारी संस्थांमधील सभासद व ग्राहक साक्षरता ........ १९
- सहकार भारती आयोजित पापड महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद ........ २०
- सांगली अर्बन को-ऑप. बँकेचे संस्थापक कै. अण्णा गोडबोले यांना अभिवादन ........ २१
- नंदुरबार सहकार भारती प्रशिक्षण शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद. ........ २२
- सुरक्षित / असुरक्षित कर्जे – सुरक्षिततेला प्राधान्य हवे ........ २३
- केंद्रीय सहकार मंत्रालय आणि नागरी बँका ........ २५
- इचलकरंजी को-ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट संस्थेची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध ... २६
- ट्रस्ट कायद्यातील विश्वस्तांसाठीच्या महत्वपूर्ण तरतुदी ........ २७
- सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेने लावलेल्या दंडांची, आयकरासाठी वजावट मिळू शकते ........ २९
- त्रिभुवन सहकारी विद्यापीठामुळे सहकार क्षेत्राच्या नव्या युगाचा प्रारंभ – राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ अध्यक्ष हर्षवर्धन पाटील ........ ३०
- बँकिंग रेग्युलेशन कायदा आणि नवीन बदल ........ ३१


## जानेवारी २०२५ पासून 'मॅगझीन पोस्ट' द्वारा वितरण

सहकार सुगंधचा अंक न मिळण्याच्या तक्रारी असल्याने पोस्ट खात्याच्या नवीन मॅगझीन पोस्ट यंत्रणेद्वारे वर्गणीदारांना १००% अंक मिळण्याची खात्री यापुढे राहणार आहे. या मॅगझीन पोस्टचा खर्च अधिक असल्यामुळे नाईलाजाने वर्गणीचे दर वाढवावे लागत आहेत. तरी कृपया वर्गणीदार, वाचक, जाहिरातदार यांनी आवश्यक सहकार्य करून नवीन दराप्रमाणे नोंदणी करावी, ही विनंती. – संपादक

'सहकार सुगंध' हे मासिक मालक, सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक भालचंद्र कुलकर्णी यांनी एन. आर. एंटरप्रायजेस, स.नं. ३९, माणिकबाग इंडस्ट्रियल इस्टेट, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे छापून ए-१२, निखिल पार्क सी सोसायटी, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे प्रसिद्ध केले.
**संपादक** – भालचंद्र कुलकर्णी

'Sahakar Sugandha' monthly is owned by 'Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., printed & published by Bhalchandra Kulkarni, Printed at N. R. Enterprises, S.No. 39, Manikbaug Industrial Estate, Sinhgad Road, Pune - 411051 & published at A-12, Nikhil Park, 'C' Society, Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051.
Editor : Bhalchandra Kulkarni

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे

**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/- फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/- फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**

**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# त्रिभुवन सहकार विद्यापीठाच्या निमित्ताने...



त्रिभुवनदास पटेल

सहकारी संस्थांसाठी पात्र मनुष्यबळ निर्माण करण्याच्या उद्देशाने गुजरातमधील आणंद येथे 'त्रिभुवन सहकार विद्यापीठ' स्थापन करण्याच्या विधेयकाला नुकतीच राज्य सभेने मंजुरी दिली आहे आणि यावर राष्ट्रपतींची सही होऊन लवकरच या विद्यापीठाची पायाभरणी केली जाणार आहे. केंद्रात सहकार मंत्रालय स्थापन झाल्यापासून सहकार चळवळीसाठी अनेकविध चांगल्या गोष्टी घडत आहेत, त्यापैकीच ही एक!

भारतातील सहकारी चळवळीच्या प्रणेत्यांपैकी एक आणि अमूलची पायाभरणी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे त्रिभुवनदास किशीभाई पटेल यांच्या नावावरून या विद्यापीठाचे नाव देण्यात आले आहे. हे सहकार क्षेत्रासाठीचे देशातील पहिले असे विद्यापीठ होणार आहे, जे या क्षेत्रातील मनुष्यबळाची क्षमता वाढवणे आणि कुशल व्यावसायिक निर्माण करणे ही गरज पूर्ण करेल. हे प्रस्तावित विद्यापीठ सहकार क्षेत्रातील कर्मचारी आणि संचालक मंडळातील सदस्यांच्या क्षमता बांधणीसाठी दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या समस्येवर उपाययोजना करू शकेल, असा आत्मविश्वास केंद्रीय सहकारमंत्री अमितभाई शाह यांनी व्यक्त केला आहे.

व्यवस्थापकीय, पर्यवेक्षी, प्रशासकीय, तांत्रिक आणि ऑपरेशनल अशा सहकारी संस्थांमध्ये विविध श्रेणीतील नोकऱ्यांसाठी व्यावसायिक पात्र मनुष्यबळाचा स्थिर, पुरेसा आणि दर्जेदार पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करून शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधनासाठी एक व्यापक, एकात्मिक आणि प्रमाणित रचना तयार करण्यासाठी या सहकार विद्यापीठाचा भविष्यात चांगला उपयोग होऊ शकेल. या त्रिभुवन सहकार विद्यापीठामार्फत सहकारी क्षेत्रात शिक्षण आणि प्रशिक्षण प्रदान करणे, युवा क्षमता निर्माण करणे, पदवी कार्यक्रम, दूरस्थ शिक्षण आणि ई-लर्निंग अभ्यासक्रम देणारी उत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्याचे नियोजन आहे. दरवर्षी अंदाजे ८ लाख व्यक्तींना प्रशिक्षण देणे तसेच दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय यासारख्या विशिष्ट क्षेत्राकरिता विशेष उपक्रम राबविण्याचे उद्दीष्ट या सहकार विद्यापीठाने निश्चित केले आहे. आज ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या शेती व्यवसायात गुंतलेली आहे आणि साडेआठ लाखांपेक्षा अधिक सहकारी संस्था कार्यरत आहेत. या संस्थांशी सुमारे ३० कोटी लोक जोडलेले आहेत, ज्यांना या विद्यापीठाचा उपयोग निश्चितपणे होऊ शकेल.

दि. २२ ऑक्टोबर १९०३ रोजी गुजरातमधील आणंद येथे किशीभाई पटेल यांच्या पोटी जन्मलेले त्रिभुवनदास हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक, वकील आणि राजकारणी होते. त्यांना भारतातील सहकार चळवळीचे जनक मानले जाते. १९४६ मध्ये कैरा जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ आणि आनंद सहकारी चळवळीची स्थापना करण्यात त्यांचा पुढाकार होता.

भारतीय स्वातंत्र्य चळवळी दरम्यान आणि विशेषतः सविनय कायदेभंग चळवळींमध्ये महात्मा गांधी आणि सरदार वल्लभभाई पटेल यांचे ते अनुयायी बनले. ज्यामुळे त्यांना सन १९३०, १९३५ आणि १९४२ मध्ये वारंवार तुरुंगवास भोगावा लागला होता. सन १९४० च्या दशकाच्या अखेरीस, त्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसोबत काम करण्यास सुरुवात केली आणि सन १९४६ मध्ये कैरा जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाची स्थापना केली. त्यानंतर सन १९५० मध्ये वर्गीस कुरियन यांना प्रमुखपदी नियुक्त केले. त्यांनी संघाच्या तांत्रिक आणि विपणन धोरणे विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, तेच आता अमूल नावाने जगभर ओळखले जाते. त्रिभुवनदास पटेल यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली आणि वर्गीस कुरियन यांच्यासोबत, आणंदमध्ये गुजरात सहकारी दूध विपणन महासंघ, राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ आणि ग्रामीण व्यवस्थापन संस्था यासह अनेक संस्था सुरू केल्या.

त्रिभुवनदास पटेल यांना 'सामुदायिक नेतृत्वा'साठी सन १९६३ चा रॅमन मॅगसेसे पुरस्कार आणि भारत सरकारकडून पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. काँग्रेस पक्षाकडून सन १९६७ आणि सन १९६८ ते १९७४ असे दोनदा राज्यसभेचे खासदार म्हणून त्यांनी काम केले. सन १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला गुजरातमधील खेडा जिल्ह्यात महिला आणि बाल आरोग्यावर काम करण्यासाठी त्रिभुवनदास फाउंडेशन नावाचा एक धर्मादाय ट्रस्ट आणि एनजीओची स्थापना त्यांनी केली. या संस्था गुजरात राज्यातील ६०० हून अधिक गावांमध्ये माता आणि शिशु काळजी क्षेत्रात आजही यशस्वीपणाने कार्यरत आहेत. सहकार चळवळीसाठी संपूर्ण जीवन समर्पित केलेल्या त्रिभुवनदास पटेल यांचे ३ जून १९९४ रोजी त्यांचे वयाच्या ९० व्या वर्षी निधन झाले. त्यामुळेच केंद्रीय सहकार विद्यापीठाला त्यांचे नांव देणे अत्यंत उचित मानले जात आहे.

सर्वच राज्यांमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या सहकार प्रशिक्षण संस्था या केंद्रातील नव्या सहकार विद्यापीठाशी संलग्न करण्याची आवश्यकता आहे. प्रशिक्षणाबरोबरच सहकाराचे विधिवत शिक्षण देणारी महाविद्यालये देखील सुरू व्हायला हवीत. सहकार हा विषय राज्यघटनेमध्ये मुलभूत अधिकारात समाविष्ट झाला असल्याने प्राथमिक शिक्षणापासूनच सहकाराचे धडे देशभरातील विद्यार्थ्यांना मिळाले, तर भविष्यात सहकार चळवळीचे सकारात्मक चित्र पाहायला मिळेल. जय सहकार!

संपादकीय...

# देशाच्या आर्थिक भविष्याला आकार व स्थिरता आणण्यात आरबीआयची भूमिका महत्त्वपूर्ण - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू



**मुंबई** – देशाच्या आर्थिक भविष्याला आकार देण्यात आणि स्थिरता येण्यामध्ये आरबीआयची भूमिका महत्वपूर्ण राहिली आहे, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी येथे बोलताना सांगितले. आरबीआयच्या ९० व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती मुर्मू बोलत होत्या.

आगामी काळातील वाटचाल ही नवीन आव्हानांची असणार आहे, असे नमूद करून त्या म्हणाल्या, मात्र त्या स्थितीमध्ये आरबीआय स्थैर्य, नावीन्य आणि सर्वसमावेशकता याबाबत कटिबद्धता कायम राखेल. आरबीआय ही केवळ काळानुरूप बदलत गेली नसून बँकेने देशाच्या आर्थिक स्थित्यंतरात मोलाची भूमिका बजावली आहे. महागाई आटोक्यात आणणे आणि वित्तीय समावेशनाला गती देतानाच बँकेने वित्तीय स्थिरता कायम राखली असून आर्थिक विकासाला गती दिली आहे. देशाच्या आर्थिक भवितव्याला बँकेने आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. देशाच्या अतुलनीय विकासाचा बँक हा केंद्रबिंदू आहे, असे त्या म्हणाल्या.

बँकेने नाबार्ड, सिडबी आणि नॅशनल हौसिंग बँक यांसारख्या संस्था स्थापन करून वित्तीय परिस्थिती भक्कम करण्याचे काम अनेक वर्षात केले आहे. या वित्तीय संस्थांच्या माध्यमातून कृषी, लघु उद्योग आणि गृहनिर्माण क्षेत्राला आवश्यक पाठबळ मिळू शकले आहे. सामान्य नागरिकांचा कमावलेला विश्वास हे गेल्या नऊ दशकातील बँकेचे सर्वात मोठे यश आहे असे त्यांनी नमूद केले.

बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितले की, बँकेने ग्राहक संरक्षण अधिक सक्षम करताना चौकटीत व्यापकता आणली आहे. यामुळे वित्तीय स्थिरता आणि कार्यक्षमता यातील संतुलन कायम राखता आले आहे. बँक आज एका प्रगतीच्या टप्प्यावर उभी आहे. बँकेने सुरुवातीपासून विस्ताराची भूमिका घेतली आहे. सध्याच्या स्थितीत वित्तीय स्थिरता, आर्थिक विकास, किंमत स्थिरता हे घटक महत्वाचे आहेत. तंत्रज्ञान क्षेत्रात होणारे बदल, जागतिक स्तरावरची अनिश्चितता, तापमान बदलाचे आव्हान आणि जनतेच्या अपेक्षा यांकडेदेखील अधिक लक्ष द्यावे लागणार आहे, असे त्यांनी सांगितले.

# सहकाराच्या क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणणे शक्य

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सूतोवाच



**नवी दिल्ली** – देशामध्ये सहकार क्षेत्राचा अजून मोठ्या प्रमाणावर विस्तार होण्यासाठी जागतिक स्तरावरील संस्थांच्या बरोबर भागीदारी करण्याची आवश्यकता आहे. तसेच सहकाराच्या क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणणे आणि युवक व महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी विविध योजना तयार करण्याची गरज असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

सहकार क्षेत्राच्या वाटचालीचा आणि आगामी काळातील योजनांचा आढावा घेण्यासाठी पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक उच्चस्तरीय बैठक झाली. त्यावेळी पंतप्रधान मोदी बोलत होते. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा, सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशिष कुमार भूतानी पंतप्रधानांचे प्रधान सचिव डॉ. पी. के. मिश्रा, शक्तिकांत दास आणि अन्य अधिकारी यावेळी उपस्थित होते.

निर्यातीच्या बाजारावर अधिक प्रमाणात लक्ष केंद्रित करण्याप्रमाणेच कृषिपद्धती सुधारण्यासाठी सहकारी संस्थांच्या माध्यमातून परीक्षण मॉडेल विकसित करण्याची गरज असल्याचे नमूद करून ते म्हणाले, सहकार मंत्रालयाच्या विविध उपक्रमाच्या माध्यमातून ‘सहकार से समृद्धी’वर अधिक भर देण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे सहकारी संस्थांमध्ये स्पर्धा असावी, मात्र ती निकोप असायला हवी. त्याचबरोबर सहकारी संस्थेच्या मालमत्तेचे दस्तऐवजीकरण करण्याची आवश्यकता असे त्यांनी सांगितले.



# देशाचा जीडीपीचा दर वाढण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता : आरबीआय संचालक सतीश मराठे यांची अपेक्षा

**सहकार भारती संस्थापक सदस्य आणि आरबीआय संचालक सतीश मराठे यांचा अमृत महोत्सवी सोहळा नुकताच येथे उत्साहात साजरा करण्यात आला. त्याविषयीचे सचित्र वृत्त.....**

**पुणे –** सहकार भारती संस्थापक सदस्य आणि आरबीआयचे संचालक सतीश मराठे यांच्या अमृत महोत्सवी सोहळ्याच्या निमित्ताने कॉसमॉस बँकेतील सभागृहात विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, महाराष्ट्राचे माजी प्रदेशाध्यक्ष डॉ. मुकुंद तापकीर आणि विद्यमान महामंत्री विवेक जुगादे आणि सहकार भारतीचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच विविध सहकारी बँका, पतसंस्था साखर कारखाने, गृहनिर्माण संस्था शासकीय अधिकारी तसेच अन्य सहकारी संस्थेतील पदाधिकारी, अधिकारी आणि कार्यकर्ते यांनी मराठे यांना शुभेच्छा दिल्या.

सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, कॉसमॉस बँकेचे माजी अध्यक्ष मिलिंद काळे आणि बुलढाणा सहकारी पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे यांनी सोहळ्याचे नियोजन केले होते. यावेळी मराठे यांचे सुवासिनींनी औक्षण केले. त्यानंतर कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष प्रल्हाद कोकरे आणि माजी अध्यक्ष मिलिंद काळे यांच्या हस्ते श्री. मराठे, डॉ. जोशी आणि डॉ. तापकीर यांचा पगडी प्रदान करून सन्मान करण्यात आला.

**आगामी काळात अर्थव्यवस्थेची गती वाढणार –**

मनोगत व्यक्त करताना मराठे यांनी सांगितले की, गेल्या १० वर्षांच्या कालावधीत देशाची अर्थव्यवस्था गतिमान झाली आहे. तसेच आगामी किमान दहा वर्षे ही गती आणखी वाढणार आहे. मात्र त्याचप्रमाणे





सर्वसामान्य जनतेचे उत्पन्न वाढण्याची गरज आहे. यासाठी सहकारी बँकांनी प्रामुख्याने ग्रामीण भागावर अधिक लक्ष देण्याची गरज आहे. कृषी प्रक्रिया, दूध व्यवसाय, पशुसंवर्धन याप्रमाणे सहकार क्षेत्रातील अन्य घटकांकडे जास्त लक्ष दिले पाहिजे. त्यामुळे सध्याचा जीडीपीचा जो दर आहे. त्यामध्ये वाढ होऊन तो किमान साडे आठ ते नऊ टक्के होऊ शकेल. तसेच ग्रामीण भागासाठी नवनवीन सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा बँकांनी पुढाकार घ्यायला हवा. कारण आगामी काही वर्षांत सहकार क्षेत्राचे महत्त्व मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

**सहकारातील विविध व्यक्तीमत्त्वांची उपस्थिती –**

कार्यक्रमाला सहकार चळवळीतील अनेक मान्यवर उपस्थित होते. निवडणूक प्राधिकरण मुख्य आयुक्त अनिल कवडे माजी सहकार आयुक्त दिनेश ओउळकर कॉसमॉस बँक माजी अध्यक्ष मिलिंद काळे अधिकारी संजय खडके बँकिंग तज्ञ गणेश निमकर, अभय माटे, महाराष्ट्र गृहनिर्माण सहकारी संघाचे सुहास पटवर्धन, लेखक श्रीकांत जाधव, सुधीर पंडित अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे गोविंदराव कुलकर्णी लेखिका वंदना धर्माधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सहकार अध्यासनचे प्रमुख अनिल कारंजकर उद्यम सहकारी बँकेच्या उपाध्यक्ष अनास्कर तसेच योगिराज सहकारी पतसंस्था, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, विश्वेश्वर सहकारी बँक सरस्वती महिला सहकारी पतसंस्था, महाराष्ट्र हाऊसिंग फेडरेशन, जनता सहकारी बँक, जनसेवा सहकारी बँक, राजगुरूनगर सहकारी बँक, पिंपरी चिंचवड सहकारी बँक, पुणे ऑडिटर्स असोसिएशन, श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना आदी संस्थांच्या पदाधिकारी, अधिकारी यांनी मराठे यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी यांनी केले.




# सहकारी गृहनिर्माण संस्थांचा स्वयंपुनर्विकास सोप्या पद्धतीने व्हावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मत

**पुणे जिल्हा आणि महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ, सहकारी पतसंस्था महासंघ, सहकारी बँक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त दोन दिवसीय महाअधिवेशन पार पडले. याबाबतचे सचित्र वृत्त...**

**पुणे –** सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहकारात स्थान नव्हते, त्यावेळी २०१९ साली त्याकरिता स्वतंत्र चॅप्टर केला. येत्या १० ते १२ दिवसांत उर्वरित नियमदेखील प्रसिद्ध करू, तसेच अपार्टमेंट कायद्यातदेखील येत्या महिन्याभरात आवश्यक पूर्तता करू. स्वयंपुनर्विकास हा आणखी सोप्या पद्धतीने व्हायला हवा. त्यामध्ये सहकारातून समृद्धीकडे नेण्याचे धोरण आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

पुणे जिल्हा आणि महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ, सहकारी पतसंस्था महासंघ, सहकारी बँक महासंघ यांच्या वतीने महाराष्ट्रातील गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स यांना मार्गदर्शन व सहकार्य मिळावे, यासाठी महाअधिवेशन आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

समारोपप्रसंगी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, आमदार प्रवीण दरेकर, ज्येष्ठ सहकार तज्ज्ञ विद्याधर अनास्कर, आमदार हेमंत रासने, धीरज घाटे, दीपक मिसाळ, संघटनेचे अध्यक्ष सुहास पटवर्धन, सीताराम राणे, मुंबई गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश दरेकर, सचिव मनिषा कोष्टी, नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया नवी दिल्लीचे कार्यकारी संचालक आशिष त्रिवेदी आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी अनेक ऑनलाईन सेवा व स्मरणिका, विविध पुस्तकांचे प्रकाशन झाले.

**※ संस्थाशी निगडित ऑनलाईन प्रणाली सुरु –**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, क्लस्टर पद्धतीने स्वयंपूर्ण विकास करण्याचा प्रयत्न आहे. गृहनिर्माण संस्थाना टँकरमुक्त करू. सोलरयुक्त संस्था हा उपक्रम सर्वत्र राबविणे गरजेचे आहे. प्रधानमंत्री सूर्य धन योजनेचा संस्थांनी लाभ घ्यायला हवा. पुढील ३ महिन्यात संस्थांशी निगडित ऑनलाईन प्रणाली सुरू होत असून पुढील सहा महिन्यांत व्हाट्सअॅपवर सुविधा उपलब्ध होतील. यामुळे नागरिकांना हेलपाटे मारावे लागणार नाहीत, असे आश्वासनही त्यांनी दिले.

**※ सहकार चळवळ सक्षम करणार –**

केंद्रीय सहकार राज्यमंत्री मोहोळ म्हणाले, भारत हा कृषीप्रधान देश असल्याने ४० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या सहकाराशी जोडली गेली आहे. देशात ८ लक्ष तर राज्यात २.२५ लक्ष सहकारी संस्था असून त्यातील १.२५ लक्ष गृहनिर्माण संस्था आहेत. त्यामुळे ही चळवळ मजबूत करण्याचा प्रयत्न आहे. आज ३० वेगवेगळ्या क्षेत्रात अशा पद्धतीचे काम सुरु आहे.

माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री शेलार म्हणाले, माहिती तंत्रज्ञानाशिवाय सहकार चळवळ चालू शकत नाही. कोविड काळात गृहनिर्माण संस्थाच्या सभा या ऑनलाईन पद्धतीनेच होत होत्या. त्यामुळे यामध्ये माहिती तंत्रज्ञानाला महत्व आहे. व्यवसायिकीकरण आणि स्वायत्तता या दोन गोष्टी सहकारी संस्थांमध्ये असायला हव्या. संस्थांच्या कार्यपद्धतीवर लोकांचा विश्वास अवलंबून असल्याचे त्यांनी सांगितले.

**पुढील पानावर...**



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दीपप्रज्ज्वलन करताना**
**मध्यभागी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व अन्य पदाधिकारी**




**महाअधिवेशनाच्या निमित्ताने तयार करण्यात आलेल्या विशेष स्मरणिकेचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री फडणवीस, उजवीकडे केंद्रीय सहकार मंत्री मोहोळ, महासंघ अध्यक्ष सुहास पटवर्धन, डावीकडे आमदार प्रवीण दरेकर, बँकिंग तज्ञ अनास्कर व अन्य**

आमदार दरेकर म्हणाले, आज स्वयंपुनर्विकास मोठी गती घेत आहे. पुण्यासह पिंपरी चिंचवडमध्ये याकरिता खूप मोठा वाव आहे. बिल्डर शिवाय पुर्नविकास करण्याबाबत आपण आत्मनिर्भर होत आहोत. मुंबई मध्ये केलेले प्रकल्प यशस्वी झाले आहेत. त्यामुळे पुणेकरांनी पुर्नविकास चळवळीत मागे राहू नये.

बँकिंग तज्ञ अनास्कर म्हणाले, गृहनिर्माण संस्थांमध्ये सहकार संस्कृती विकसित होईल, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. गृहनिर्माण संस्था म्हणजे भांडण हे सगळ्यांचे असलेले मत दुरुस्त करायला हवे. अनेक संस्थांमध्ये चांगली संस्कृती आहे. एकमेकांना मदतदेखील केली जाते. एकी हेच बळ हे सहकाराचे तत्व असून सहकाराची शिस्त सहकार टिकवण्यासाठी हवी. महासंघ अध्यक्ष पटवर्धन म्हणाले, नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था स्वयंपुनर्विकास २०१९ च्या आदेशानुसार अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तसेच २०१९ च्या सहकार कायद्याच्या नियमावलीची देखील अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. मानीव हस्तांतरण ऑनलाईन पद्धतीने, एका खिडकी योजना, बिगरशेती कर आकारणी कायम स्वरूपात रद्द व्हावी. जिल्हा आणि राज्य महासंघास कार्यालय आणि सहकार संवाद ऑनलाईन पोर्टलचा विकास आवश्यक असल्याच्या मागण्या त्यांनी केल्या.

**गृहनिर्माण संस्थांचे प्रश्न सोडविण्यावर भर देणार – सहकार आयुक्त दीपक तावरे –**

सहकारी गृहनिर्माण संस्थांचेही महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर जाळे आहे. सहकार चळवळ अधिक बळकट करण्यासाठी राज्यातील गृहनिर्माण संस्थांचे प्रश्न सोडवण्यावर भर देणार असल्याचे राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी सांगितले.

पुणे जिल्हा आणि महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ, सहकारी पतसंस्था महासंघ, सहकारी बँक महासंघ यांच्या वतीने महाराष्ट्रातील गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स यांना मार्गदर्शन व सहकार्य मिळावे, यासाठी महाअधिवेशन आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष सुहास पटवर्धन, मुंबई गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश दरेकर, शामला देसाई, सचिव मनिषा कोष्टी, जिल्हा उपनिबंधक संजय राऊत, नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया कार्यकारी संचालक आशिष त्रिवेदी, कार्यकारी संचालक कर्नल प्रमोद दाहीतुले, विभागीय सहनिबंधक योगीराज सुर्वे, किरण सोनवणे, आर्किटेक्ट विश्वास कुलकर्णी आदी उपस्थित होते.

**सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रश्न सोडवण्यावर भर –**

आयुक्त तावरे म्हणाले, संपूर्ण देशामध्ये चार लाखांहून अधिक सहकारी संस्था आहेत. त्यापैकी सुमारे अडीच लाख संस्था महाराष्ट्रामध्ये आहे. महाराष्ट्र ही सहकारी संस्थांची गंगोत्री आहे, सहकारी संस्था वाढल्या आणि त्याचा फायदा महाराष्ट्राच्या विकासामध्ये झाला. सहकारी पतसंस्था बँका आणि साखर कारखान्यांबरोबरच गृहनिर्माण संस्थांचेही महाराष्ट्रामध्ये मोठे जाळे आहे. त्यांचा कारभार अधिक सुलभ करण्यासाठी येत्या काळामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या प्रश्न सोडवण्यावर भर देणार आहे.

त्रिवेदी म्हणाले, महाराष्ट्रामध्ये शहरीकरण जसे वाढत आहे, तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. त्यांचे प्रश्न अधिक व्यापक बनत आहेत. या संस्थांच्या कारभारामध्ये एक वाक्यता यावी, यासाठी योग्य प्रशिक्षण शिबिरे राज्यभरात राबविणे गरजेचे आहे. त्यासाठी केंद्रीय आणि राज्यस्तरावर विविध प्रशिक्षण अभ्यासक्रमांची मांडणी करण्यात आली आहे.

देसाई म्हणाल्या, राज्यातील गृहनिर्माण संस्थांच्या कामांमध्ये सुसूत्रता येण्यासाठी राज्य गृहनिर्माण संस्था ही गेल्या ५० वर्षांपासून काम करत आहे. या संस्थेची आजही महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर गरज आहे. गृहनिर्माण संस्थांमध्ये महिलांची सुरक्षा हा प्रश्न ऐरणीवर आला असून त्यासाठी पोलीस कमिट्या स्थापन करणे गरजेचे असून त्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेतला पाहिजे.

दरेकर म्हणाले, सहकार क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे. त्यामुळे सहकार क्षेत्र बळकट केले तर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होऊ शकतो. महाराष्ट्र ही सहकारी संस्थांची पंढरी आणि काशी आहे. या सहकारी संस्थांचा महाराष्ट्राच्या विकासामध्ये मोठा हातभार लाभलेला आहे. हेच मॉडेल देशभर राबवून सहकारी संस्थांचे जाळे अधिक बळकट केले, तर त्याचा निश्चितच फायदा होणार आहे.

पटवर्धन यांनी सांगितले की, सहकारी संस्थांचे

**पुढील पानावर...**



**महाअधिवेशनाचे उद्घाटन करताना सहकार आयुक्त दीपक तावरे व महासंघाचे पदाधिकारी**

# एआय तंत्रज्ञानामुळे कमी पाण्यात ऊसाचे उत्पादन वाढणे शक्य

**पुणे –** ऊसाचे पीक कमीत कमी पाण्यामध्ये आणि कमी हेक्टरमध्ये ऊसाचे अतिरिक्त उत्पादन घेऊ शकतो, हे एआय कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे शक्य होत आहे. शेतकऱ्यांनी हे तंत्रज्ञान शेतात अवलंबल्यास येत्या ३-४ वर्षांत एआयच्या वापरामुळे ऊस उत्पादनासह अर्थकारणात क्रांतीकारक बदल होतील, असे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सांगितले.

आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावीपणे वापर करण्यासंदर्भात वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन आणि ग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने बारामती येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेचे उद्घाटन ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर खासदार सुप्रिया सुळे, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख आणि ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र पवार, विस्माचे अध्यक्ष बी.बी. ठोंबरे, उद्योजक प्रतापराव पवार, साखर संघाचे अध्यक्ष पी.आर. पाटील आदी उपस्थित होते. बारामती जवळील कृषी विज्ञान केंद्रात ऊसाची प्रात्यक्षिक पाहणी करून एआय तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले. ऊस उत्पादनामध्ये एआय तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी येणाऱ्या खर्चातील खारीचा वाटा म्हणून विस्मातर्फे ११ लाख रूपयांची देणगी जाहीर करण्यात आली.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन एकरी खर्च कमी करून ऊस उत्पादन वाढविण्यासाठी ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टने मायक्रोसॉफ्ट व ऑक्सफर्ड यांसारख्या जागतिक संस्थांच्या मदतीने प्रयोग केले असून ते यशस्वी झाले आहेत. कृषी क्षेत्रात आमूलाग्र क्रांती घडविण्याची सुरुवात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराने सुरू झाली असून त्याचा लाभ राज्यभरातील सहकारी व खासगी साखर कारखाना कार्यक्षेत्रातील सर्वच ऊस उत्पादकांना व्हावा, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत कृत्रिम बुद्धिमत्तेसंदर्भात अमेरिका आर्यलँड, इंग्लंड व दुबई येथील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत शंभरपेक्षा अधिक प्रतिनिधी उपस्थित आहेत.

ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले की, ऊस क्षेत्रात संशोधन करणाऱ्या संस्था, राज्य शासन आणि केंद्र शासन यांनी एकत्र येऊन धोरणात्मक पातळीवर निर्णय घेणे आवश्यक आहे. जागतिक पातळीवरील तंत्रज्ञान आता ऊस शेतीमध्ये आणत असून जमिनीची सुपीकता वाढवणे, रोगांचे नियंत्रण करणे, ऊसाचे उत्पादन आणि ऊसाची रिकव्हरी वाढवणे आदी घटकांवर काम करणे तंत्रज्ञानामुळे सहज शक्य होणार आहे.

विस्माचे अध्यक्ष ठोंबरे म्हणाले की, अलीकडचा साखर कारखाना उद्योग हा संकटात आला असून निदान १५० दिवस कारखाना सुरू राहणे अपेक्षित असताना ९० दिवसातच कामकाज ठप्प होत आहे. कारखान्यातील काम थांबले तरी ३६५ दिवसांचा पगार तसेच व्यवस्थापन आणि देखभाल खर्च कारखान्यांना करावाच लागतो. संशोधन संस्थांनी एकत्र येऊन टास्क फोर्सची स्थापना करणे आवश्यक आहे. एआय तंत्रज्ञानाची अंमलबजावणी केल्यानंतर एकदम चित्र पालटणार नसले तरी ऊस शेती आणि साखर कारखान्यांशी संबंधित अडचणींवर कृत्रिम बुद्धीमत्ता हा मार्ग दाखवणारा आशेचा किरण असेल, ऊस उत्पादनाकडे साखर कारखानदारांनी गांभीर्याने पाहण्याची वेळ आली असून ऊस विकासासाठी कारखानदारांनी निधीची तरतूद करणे अपेक्षित आहे.

एआयमुळे साखर उद्योग सशक्त होईल असे नमूद करून ते म्हणाले, ऊस उद्योग क्षेत्रात खासगी कारखानदारी वाढत असून ५० ते ५२ टक्के त्यांचा वाटा आहे. साखर कारखानदारांची क्षमता वाढत असली तरी प्रती एकरी उत्पन्न वाढत नाही, ही चिंतेची बाब आहे. ऊसापासून घेण्यात येणाऱ्या पर्यायी उत्पादनांसाठी देखील कच्चा माल उपलब्ध होत नाही, ऊस शेतीतील अडचणी लक्षात घेता ऊस उत्पादक शेतकरी आता केळी या पर्यायी उत्पादनाकडे वळू लागले आहेत, ही चिंतेची बाब आहे, असे ते म्हणाले.

खासदार सुप्रिया सुळे यांनी मनोगत व्यक्त केले. उद्योजक प्रतापराव पवार यांनी स्वागत केले.

## राज्यात एआय आधारित ऊस शेती वाढण्यासाठी व्हीएसआयमध्ये कृतिगट स्थापन

**पुणे –** राज्याच्या विविध भागातील ऊसाची शेती एआय कृत्रिम बुद्धिमत्ता मोठ्या प्रमाणावर यावी यासाठी कोणकोणती उपाययोजना करता येणे शक्य आहे. तसेच या नवीन तंत्राचा विस्तार होण्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या वतीने नव्याने कृतिगट तयार करण्यात आला आहे. संस्थेच्या नियामक मंडळाची सभा नुकतीच झाली, त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला.

संस्थेचे विश्वस्त आणि माजी मंत्री जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली कृति गट तयार करण्यात आला आहे. संस्थेचे सल्लागार शिवाजीराव देशमुख हे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत याखेरीज, उपमुख्यमंत्री अजित पवार, जयप्रकाश दांडेगावकर, बी. बी. ठोंबरे महासंचालक संभाजी कडू पाटील, राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री विश्वजित कदम यांचा कृति गट समितीमध्ये समावेश आहे.

नवीन तंत्रज्ञान ऊसाच्या शेतीपर्यंत कसे न्यायचे तसेच विविध भागातील साखर कारखान्यांची भूमिका कशी असावी आणि नवीन तंत्रज्ञानाचा विस्तार याबाबत कृतिगट विचार विनिमय करून निर्णय घेणार आहे.

---

# सहकारी गृहनिर्माण संस्थांचा स्वयंपुनर्विकास सोप्या पद्धतीने व्हावा....

पुर्ननिर्माण आणि स्वपुनर्निर्माण या संदर्भात अनेक अडचणी येत आहेत, या संदर्भातील कायदे केवळ कागदावर राहून चालणार नाहीत. सध्या गतिमान सरकार आलेले आहे. या कामालाही निश्चितच गती मिळेल सहकारी गृहनिर्माण संस्थांचे पुनर्निर्माण आणि स्व-पुनर्निर्माण या संदर्भात नियम सुरळीत केले, तर त्याचा निश्चितच सर्वसामान्य नागरिकांना फायदा होऊ शकेल.

सहकार मंत्रालय केंद्र आणि राज्य, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे आणि महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था महासंघ, पतसंस्था, बँका महासंघ, म्हाडा सिडको, रोटरी, लायन्स, एनएससीसी, अटल, पुणे पत्रकार संघ, क्रेडाई मेट्रो, ज्येष्ठ नागरिक संघ, महिला मंडळे, हास्य क्लब विविध शैक्षणिक संस्था, विद्यार्थी आणि इतर समविचारी संघटनांच्या सहकार्याने आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यात सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी पुनर्विकसन, स्वयं-पुनर्विकसन, घनकचरा, ओलासुका कचरा व्यवस्थापन, ई-चार्जिंग सुविधा, अपारंपरिक ऊर्जा सौर ऊर्जा सोसायट्यांच्या खरेदी खत, मानीव हस्तांतरण, निवडणुका, तंटामुक्त सोसायटी, टँकर मुक्त संस्था, सहकार मित्र, सहकार संवाद ऑनलाईन पोर्टल, बिगर शेती कर, सायबर क्राईम, सीसीटिव्ही रेन वॉटर हार्वेस्टिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता, सदनिका खरेदी, विक्री, भाड्याने देणे, संस्थांमधील पाळीव प्राणी, सहकारातील असहकार, उदासीनता इत्यादी विषयांवर चर्चासत्र, परिसंवाद आणि प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

# पारदर्शी व्यवहार हा सहकाराचा आत्मा - महामंत्री विवेक जुगादे

## सहकार भारतीतर्फे सहकार प्रशिक्षण व स्नेहमेळावा यशस्वी

**चंद्रपूर –** सहकार हे सेवाक्षेत्र आहे.सहकाराची उंची वाढविण्यासाठी या क्षेत्रात प्रामाणिकपणा व समर्पित वृत्तीची गरज आहे. पारदर्शी व्यवहार हा सहकाराचा आत्मा आहे. त्यामुळे पतसंस्थांनी स्पर्धेच्या मोहात न पडता विश्वस्ताच्या भूमिकेतून काम करावे, असे सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे सांगितले.



प्रतिकार नागरी सहकारी पतसंस्थेत सहकार भारती चंद्रपूर तर्फे आयोजित जिल्हास्तरीय सहकार प्रशिक्षण व स्नेहमीलन सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रदेश सचिव विनोद भीमनवार हे होते. ते म्हणाले, संस्काराशिवाय सहकाराचे पावित्र्य राखले जाऊ शकत नाही. त्यामुळे सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांना प्रशिक्षणातून संस्कारीत करण्याचे कार्य दीर्घकाळापासून सहकार भारती करीत आहे. सभासद व ग्राहकाप्रतीचा विश्वास निर्माण करण्यासाठी पतसंस्थांनी संस्कारीत होऊन प्रामाणिकपणे उत्तमोत्तम कार्य करावे.

विभाग सहप्रमुख विजय गोटे, जेष्ठ मार्गदर्शक महेश मासुरकर, प्रतिकार संस्थेचे अध्यक्ष माणिकराव पाटेवार यांचीही समायोचित भाषणे झाली. जिल्ह्यातील पतसंस्थांचे पदाधिकारी, संचालक व कर्मचारी यांचा प्रशिक्षणाचा वर्ग घेण्यात आला. डी. एन. काकडे यांनी 'पतसंस्था व्यवस्थापन व सक्तीची कर्जवसुली' यावर तर स्वाती कुलकर्णी यांनी 'सहकारी पतसंस्था व आयकर कायदा' यावरील नियम व कायदे समजावून सांगितले. माजी सभापती चंदू मारगोनवार, जिल्हा महामंत्री पुष्पा गोटे, भाग्यश्री नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष किशोर महालक्ष्मे, राजेश कावलकर, प्रगती माढई यांच्यासह जिल्ह्यातील विविध पतसंस्थांचे पदाधिकारी, संचालक व कर्मचारी उपस्थित होते.

प्रास्ताविक सहकार भारती जिल्हाध्यक्ष सतीश वासमवार यांनी तर सूत्र संचालन सुरज बोम्मावार आणि आभार किशोर आनंदवार यांनी मानले. जिल्ह्यातील दि महाराष्ट्र अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी, जयकिसान नागरी सहकारी पतसंस्था, प्रतिकार नागरी सहकारी पतसंस्था, उत्कर्ष ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, प्रवीणभाऊ नागरी सहकारी पतसंस्था, प्राथमिक शिक्षक पतपुरवठा सहकारी संस्था, जि.प.प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था, कल्पतरू बिगरशेती सहकारी पतसंस्था, कल्पवृक्ष महिला ग्रामीण बिगरशेती पतसंस्था, विदर्भ महिला क्रेडीट को-ऑप. सोसायटी, कांतीज्योती नागरी सहकारी पतसंस्था, श्री साई नागरी सहकारी पतसंस्था, संताजी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, आनंद शालेय माध्यमिक कर्मचारी सहकारी पतसंस्था सहभागी झाल्या.

## पद्मश्री सुभाष शर्मा यवतमाळ अर्बन बँकेतर्फे सन्मानित

**यवतमाळ –** यवतमाळ जिल्ह्यातील शेती तज्ज्ञ, सेंद्रिय व नैसर्गिक शेतीचे पुरस्कर्ते सुभाष शर्मा यांना पद्मश्री पुरस्काराबद्दल यवतमाळ अर्बन बँकेतर्फे त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

लोकांना विषमुक्त अन्न मिळावे, भारतात कृषि संस्कृती रुजवावी, पर्यावरण रक्षण व्हावे यासाठी शाश्वत शेतीकडे वळलो असून नैसर्गिक शेतीसाठी आयुष्य देईल असे शर्मा यांनी सत्काराला उत्तर देतांना सांगितले.

बँकेचे अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे, उपाध्यक्ष अजिंदरसिंह चावला, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधरराव कोहरे, संचालक आशिष उत्तरवार, गोवर्धन राठोड, प्रशांत मादमशेट्टीवार, प्रमोद धुर्वे, डॉ. महेश सारोळकर, संतोष पेंशनवार, डॉ. संतोष कुचनकर, मीराताई घाटे तसेच बँकेचे सरव्यवस्थापक व अधिकारी उपस्थित होते.

## वर्धा नागरी सहकारी बँकेच्या यवतमाळ शाखेचे उद्घाटन



**वर्धा –** 'एकमेकां सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' हे सहकाराचे तत्व असून समता, बंधुभाव, प्रामाणिकपणा, आपलेपणा, जिव्हाळा आणि कर्तव्य कठोरता याचा उपयोग सहकारी बँकांनी व्यवहारात करावा अशी अपेक्षा रा. स्व. संघाचे विभाग संघचालक बंडू कोषटवार यांनी व्यक्त केली आहे. येथील वर्धा नागरी सहकारी यवतमाळ शाखेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. बँक अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे अस्थिरोग तज्ञ डॉ. अजित फडके उपस्थित होते. सन २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष नुकतेच जाहीर करण्यात आले आहे असे नमूद करून डॉ. खर्चे यांनी सांगितले की, सहकारी परिवारातील बँकांनी एकमेकांना मदतीचा हात पुढे करून अंत्योदय साधावा. तर डॉ. फडके यांनी बँकेच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कांचन केळकर यांनी सूत्रसंचालन आणि डॉ. विनय देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. उपाध्यक्ष मंगेश परसोडकर यांनी आभार मानले. बँक संचालक, अधिकारी, कर्मचारी, खातेदार यावेळी उपस्थित होते.

## सहकार भारती भंडारा जिल्हा अध्यक्षपदी शिवराम गिरिपुंजे

**भंडारा –** सहकार भारती भंडारा जिल्ह्याच्या अध्यक्षपदी शिवराम गिरिपुंजे यांची तर मनीष कापगते यांची महामंत्रीपदी निवड करण्यात आली. जिल्हा सहकार भारतीच्या वतीने सहकार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, प्रदेश ग्रामीण सहकार प्रकोष्ठ प्रमुख अनिल मेंढे, नागपूर विभाग प्रमुख संजय रोकडे उपस्थित होते.

कार्यक्रमाला सहकारी बँक, सहकारी पतसंस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, दुग्ध सहकारी संस्था, मत्स्य सहकारी संस्था, सहकारी भात गिरणी, विणकर सहकारी संस्था अशा विविध प्रकोष्टमधील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भंडारा जिल्ह्यामध्ये सहकार भारतीचे कार्य अतिशय वेगाने वाढवण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# सहकारी बँकांनी सायबर सुरक्षेतेबाबत सक्षम यंत्रणा करावी - आरबीआय गव्हर्नर मल्होत्रा

**मुंबई –** ठेवीदारांच्या आणि ग्राहकांच्या विश्वासाला प्राधान्य देण्याबरोबर सहकारी बँकांनी माहिती तंत्रज्ञान आणि सायबर सुरक्षेबाबत सक्षम यंत्रणा कार्यान्वित करण्याची गरज असल्याचे आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सहकारी बँकाच्या विशेष संयुक्त बैठकीत सांगितले. निवडक सहकारी बँकांचे पदाधिकारी आणि राष्ट्रीय स्तरावरील संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. नूतन पदाची सूत्रे स्विकारल्यानंतर त्यांनी नागरी सहकारी बँकेच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.



नॅशनल अर्बन को-ऑप. फायनान्स अँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष ज्योतिंद्रभाई मेहता, नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑप. बँक्स अँड क्रेडिट सोसायटीचे उपाध्यक्ष मिलिंद काळे तसेच सारस्वत को-ऑप. बँक अध्यक्ष गौतम ठाकुर, एसव्हीसी को-ऑप. बँक अध्यक्ष दुरेश चंद्रावकर, कॉसमॉस सहकारी बँक अध्यक्ष प्रल्हाद कोकरे, टीजेएसबी बँक अध्यक्ष शरद गांगल, जनता सहकारी बँक अध्यक्ष रविंद्र हेजीब, विशाखापट्टणम् को-ऑप. बँक अध्यक्ष राघवेंद्र राव, माणदेशी महिला सहकारी बँक अध्यक्षा चेतना सिन्हा, डोंबिवली नागरी सहकारी बँक अध्यक्ष गणेश धारगलकरे तसेच अन्य सहकारी बँकांचे पदाधिकारी आणि आरबीआयचे डेप्युटी गव्हर्नर एम. राजेश्वर राव आणि स्वामिनाथन जे आणि कार्यकारी संचालक उपस्थित होते.

गव्हर्नर मल्होत्रा यांनी आरबीआयच्या भूमिकेचा पुनरुच्चार करून सांगितले की, नागरी सहकारी बँकांनी ग्राहक सेवेच्या सर्व मानकांचे पालन करावे. तळागाळातील आर्थिक समावेशनाला चालना देण्यासाठी सहकारी बँकांनी बजावलेल्या भूमिकेचे त्यांनी स्वागत केले. या क्षेत्रासमोरील नियामक आणि कार्यात्मक आव्हानाबाबत त्यांनी यावेळी सूचना देण्याचे आवाहन केले. तसेच ग्राहक सेवा आणि ठेवीदार यांच्या विश्वासाला टाडा जाणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

यावेळी मेहता यांनी सांगितले की, आरबीआय आणि नागरी सहकारी बँक यांच्यातील चर्चा अतिशय सकारात्मक आणि यशस्वी झाली. नागरी सहकारी बँकांसमोरील विविध समस्या आणि त्यावरील उपाययोजना याबाबत सविस्तर चर्चा झाली.

# सहकार भारती पनवेल महानगराच्या वतीने महिलांचा सन्मान



**पनवेल –** सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पनवेल सहकार भारती महानगराच्या वतीने नुकताच करण्यात आला. सहकार भारती प्रदेश महिला अध्यक्षा वैशाली आवाडे तसेच वर्षा ठाकुर यावेळी उपस्थित होत्या.

कमळ नागरी सहकारी पतपेढी अध्यक्षा मालती आंग्रे, सहकार भारतीच्या भारती काटुळे, दीनदयाळ अंत्योदय योजनेच्या शहर अभियान व्यवस्थापक विनया म्हात्रे, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा अधिकारी सुशीला घासे, बचत गट संघटक स्वप्ना साखरे, सारस्वत बँकेच्या कनिष्ट अधिकारी स्वाती चिंचोलीकर, सुलोचना किनगी, कर्ज वसुली अधिकारी अनिता डुंबरे, सुवर्णा तोंडूलकर, डॉ. नीलिमा मोरे, शिवनेरी महिला बचत गट, छत्रपती महिला ग्राम संघ, रायगड महिला बचत गट यांचा सन्मान करण्यात आला.

आम्ही उद्योगिनी संस्थेच्या अध्यक्षा शुभांगी तिरोडकर, त्याचप्रमाणे मोहिनी पाटील, दीपा पाटील, सहकार भारती पनवेल महानगर अध्यक्ष त्रिवेणी सालकर, महिला प्रमुख अपर्णा नाडगौडी, उपाध्यक्ष रत्नाकर कुलकर्णी, खजिनदार संजय पावस्कर, सचिव किरण शिंदे, संघटन प्रमुख विश्वास शिंदे, स्मिता शेडगे आदी उपस्थित होते.

# राज्य सहकारी बँकेत कुस्तीपटूसाठी पांच टक्के जागा राखीव

**मुंबई –** महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने त्यांच्या सेवा नियमांमध्ये बदल करत राज्यस्तरीय मातीवरील व गादीवरील कुस्ती स्पर्धेमध्ये विविध गटांमध्ये सुवर्णपदक पटकावणाऱ्या विजेत्यांसाठी व 'महाराष्ट्र केसरी' अथवा 'हिंद केसरी' या पुरस्कार प्राप्त कुस्तीगिरांसाठी कर्मचारी भरतीमध्ये किमान ५ टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय बँकेचे प्रशासक व ज्येष्ठ बँकिंग तज्ञ विद्याधर अनास्कर यांनी जाहीर केला आहे.

या धोरणास अनुसरून महाराष्ट्रामध्ये किमान १५ वर्षे वास्तव्यास असलेल्या तसेच राज्य बँकेच्या सेवा नियमांमधील सर्व निकषांची पूर्तता करणाऱ्या कुस्तीगिरांना राज्य बँकेच्या सेवेमध्ये ५ टक्के इतक्या जागा आरक्षित ठेवून त्यांना संधी देण्याचे धोरण राज्य बँकेने स्वीकारले आहे.



# दूध दरवाढीचे गणित

**दुधाच्या दरात वाढ झाली, की अस्वस्थता-नाराजी व्यक्त होते. प्रत्यक्षात उत्पादकांपर्यंत या दरवाढीचे फायदे पोहोचत नाहीत. उत्पादक - शेतकऱ्यांनाही हे लाभ मिळावेत आणि ग्राहकांनाही रास्त दरात दूध मिळावे, यासाठी योग्य धोरणे आखण्याची गरज आहे.**



**विवेक क्षीरसागर**
**९९७०० ६६७८६**

**गेल्या काही दिवसांत पुन्हा दुधाच्या दरात वाढ झाली असून दूध उत्पादक शेतकऱ्यांना नेमका कोणता लाभ होणार आहे, याविषयीचे विवेचन करणारा हा लेख....**

दुधाचे लिटरमागील रुपया-सव्वा रुपयाचे दर ३३ रुपयांवर गेले आहेत. जरा वेगळा विचार केला, तर सोन्याचा दर पूर्वी २०० रुपये होता, तो ८० हजार रुपयांवर गेला आहे. म्हणजेच सोन्याच्या दरात ४०० पटींनी वाढ झाली. त्या तुलनेत दुधाची दरवाढ ही ३० ते ३३ पट आहे, असे म्हणता येईल. पूर्वीच सरासरी तीनशे-चारशे रुपयांचे पगार आज ४० हजार, म्हणजे शंभरपट आहेत. पूर्वी चार रुपये किलो मिळणाऱ्या मटणाचा दर आता आठशे रुपये, म्हणजे ४०० पट वाढला आहे. सगळीकडेच महागाई वाढत असताना दुधाच्या दरवाढीबाबत मोठा अन्याय होत असल्याची भावना व्यक्त होते. त्याचीच पुनरावृत्ती शेतीमालाबाबतही दिसते. आजही काही वेळा शेतीमालाचा दर हा ४० वर्षांपूर्वीच्या दराइतकाच असतो. दुधाचे मोठ्या प्रमाणात अतिरिक्त उत्पादन झाले, तर ते १०-१५ रुपयांनाही विकत घेतले जात नाही; कोथिंबीरीची पेंडी एकदा शंभर रुपयांना मिळते, ती कधी एका रुपयातही कोणी घेत नाही.

आज देशामध्ये प्रतिमाणशी दुधाची उपलब्धता ही साधारण ३०० मि.लि. एवढी आहे, जी इस्रायलसारख्या देशांमध्ये १२०० मिलीपर्यंत आहे. याचाच अर्थ या आघाडीवर प्रगतीसाठी आपल्याला चौपट वाव आहे; पण आज सध्याचे दूध हाताळतानाच आपली इतकी दमछाक झाल्याचे दिसते, की उपलब्ध दुधाचेच करायचे काय, असा प्रश्न अनेकदा पडतो. त्यातच महाराष्ट्रामध्ये सरकारी दूध योजना, सहकारी दूध संघ आणि खासगी डेअरी यांच्यातील तीव्र स्पर्धा लक्षात घेता आज महाराष्ट्रातील दूध व्यवसाय हा ७० टक्के खासगी व्यवसायिकांच्या ताब्यात गेलेला असून सहकाराकडे फक्त २९ इतकाच वाटा आहे, सरकारकडे तर एक टक्का दुधाचा व्यवसाय राहिला आहे. त्यामुळे सरकारची याबाबत भूमिका काय, हे समजणे कठीण आहे. कारण सरकारचे या व्यवसायावर योग्य व पुरेसे नियंत्रण नाही, हे दूध भेसळीच्या अनेक उदाहरणांवरून दिसते. तसेच कोण, किती आणि कोणत्या प्रकारे दूध गोळा करते आणि त्याचे काय करते, याची परिपूर्ण माहितीही उपलब्ध असल्याचे दिसून येत नाही. इस्रायलच्या काही प्रतिनिधींशी चर्चा करताना समजले, की सुमारे दहा लाख गायींच्या दुधाचा गायनिहाय, फॅटनिहाय अहवाल दुसऱ्या दिवशी तेथील दुग्धविकासमंत्र्यांच्या टेबलवर त्याच्या वापराच्या तपशिलासह असतो. आपल्याकडे प्रत्यक्षात गायी किती आहेत, अशा प्राथमिक बाबीही मोघमपणे चाललेल्या दिसतात. या स्थितीत नियोजनाचा बोजवारा उडल्याचे स्पष्ट होते. देशपातळीवर विचार केला, तर आज महाराष्ट्र दूध उत्पादनात नवव्या क्रमांकावर आहे; परंतु दुधाच्या वापरामध्ये तो सतराव्या क्रमांकावर आहे, ही एक प्रकारे लाजिरवाणी बाब ठरते. वास्तविक पंजाबमध्ये दुधाची प्रतिमाणशी उपलब्धता ९०० मि. लि. वर असताना महाराष्ट्रात ती कशीबशी २५०-३०० मि. लि. च्या घरात आहे, त्यातही खेडेगावांतील व्यक्तींमध्ये तर ती २०० मि. लि. पेक्षाही कमी आहे.

असा स्थितीचे राज्यात दुधाचा प्रतिमाणशी वापर वाढविणे, हा दुधाला चांगला दर मिळविण्याचा राजमार्ग आहे. दुधाचे इतर पदार्थ, उदा. वेगवेगळ्या प्रकारचे श्रीखंड, आम्रखंड, दुधाची पावडर, तूप, दही यांना प्रचंड मागणी असली, तरी त्यातून मिळणारा फायदा हा शेतकऱ्यांकडे जात नाही, हे म्हणणे वावगे ठरणार नाही, आता उलटस हिशेब घालण्याची वेळ आली आहे. (आताच्या दरात दोन रुपये वाढ धरून गायीच्या दुधाचा दर ५४ रुपये, तर म्हशीच्या दुधाचा दर ७४ रुपये झाला आहे. अशा वेळेस प्रत्येकी १४ रुपये इतर खर्चाचा समावेश केला, तर गायीच्या दुधाला ४० रुपये आणि म्हशीच्या दुधाला ६० रुपये दर मिळणे अपेक्षित आहे. परंतु, महाराष्ट्रात पाहिले तर आपल्याकडे गाव पातळीवर काही 'बल्क कूलर' खासगी, तर काही सहकारी आहेत, तालुका संघ-जिल्हा संघ आहेत, महासंघ आहेत 'मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह' आहेत, छोट्या डेअरी आहेत. लहानमोठे उद्योग आणि मोठमोठ्या बहुराष्ट्रीय डेअरीही आहेत. त्यामुळे येथे कुरुक्षेत्रासारखे वातावरण असून कुणाचाच कुणाशी पायपोस नसल्याचे दिसते.

राज्य सरकारने मध्ये राज्य मिल्क मार्केटिंग बोर्डासारख्या संस्थेची स्थापना करून त्यात सरकारी पदाधिकारी, खासगी संस्थांचे प्रतिनिधी आणि सहकारी दूध संघांतील पदाधिकाऱ्यांची समिती करून त्यांना या प्रकारचे लक्ष्य देण्याची गरज आहे. दुधाचे दर ठरवताना शेतकऱ्यांचा प्रथम प्राधान्याने विचार करून ग्राहकांनाही स्वच्छ निर्भेळ दूध रास्त दरात कसे मिळेल, याचा विचार करण्याची गरज आहे. दुधाची भाववाढ झाल्यानंतर प्रत्यक्षात शेतकऱ्याला त्याचा फायदा मिळतो का, किंवा त्याला पैसे मिळाले, तरी दुसरीकडे पशुखाद्याच्या दरांत वाढ करून त्याला मिळणारा फायदा लगेच त्यांनी स्वतःकडे ओढून घेण्याचा वर्षानुवर्ष चाललेला प्रकारही थांबवण्याची गरज आहे. आज या क्षेत्रातील सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे. 'एक रहेंगे तो सेफ रहेंगे,' या पद्धतीने दूध व्यवसायाचा विकास झाला, तर ग्रामीण अर्थव्यवस्था सुदृढ करण्याची, पर्यायाने गावाकडून शहराकडे वाढलेला लोंढा कमी करून शहरेही स्वच्छ-सुंदर करण्याची क्षमता अशा व्यवसायांत आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. त्यात शेतकऱ्याचे योगदान हे सर्वांत मोठे आहे. तो गाय नऊ महिने नऊ दिवस सांभाळतो मात्र, सध्या वितरक फक्त क्रेटमधून पिशवी उचलून ग्राहकाच्या हाती देतो, त्या एका मिनिटासाठी साधारण पाच ते दहा रुपये मिळतात. हा विरोधाभास दूर करण्याची गरज आहे. त्यासाठी संघटितपणे सरकार, सहकारी संस्था आणि खाजगी संस्थांनी एकत्र येऊन एक धोरण ठरवून शेतकऱ्यांचा विचार केला पाहिजे. तसेच दुधासोबत ज्या गोष्टी त्याला अधिक दर देऊ शकतात, त्या शेण, गोमूत्र आणि नव्या वासरांची पैदास या बाबींचा शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार झाला पाहिजे. इंधनासाठी गोबर गॅस, गोमूत्रापासून आयुर्वेदिक औषधे आणि वासरांचा शेतीमध्ये वापर केला, तर शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मानस प्रत्यक्षात आणता येईल. दुधाचा वापर मोठ्या प्रमाणात जर वाढविणे शक्य झाले, तर या व्यवसायाचे रूप पालटून जाईल आणि देशाच्या विकासातही दुधाची खूप मोठी मदत आपल्याला मिळू शकते.

**- डॉ. विवेक क्षीरसागर** Email - mtedittimesofindia.com
**(लेखक पुणे जिल्हा सहकारी दूध संघाचे निवृत्त व्यवस्थापकीय संचालक आहेत.)** *****

# पतसंस्थांचे करारनामे : आर्थिक सुरक्षिततेचा महत्त्वपूर्ण दुवा

आपली पतसंस्था ही लहान असो की मोठी, आपल्याला प्रत्येक पतसंस्थेला किमान सतरा-अठरा प्रकारचे करारनामे तयार करावे लागतात. जसजशी पतसंस्था विस्तारली जाईल, तसतसे या करारांची संख्यादेखील वाढायला सुरूवात होते, वाढते. अगदी सुरुवातीला कर्ज करारनामा, कर्मचारी करारनामा, पिग्मी एजेंट करारनामा, गोल्ड व्हॅल्यूअर करारनामा इत्यादी प्राथमिक करारनामे तयार करावे लागतात. थोडसं ॲडव्हान्स लेवलवरती सीबीएस व्हेंडरसोबत हा कारारनामा, शाखा विस्तारात फर्निचर किंवा इतर आस्थापना पुरवणाऱ्या व्हेंडरसोबत करारनामा तयार करावे लागतात. तसेच काही क्लिष्ट स्वरूपाचे करार - जसे मोबाईल बँकिंग, यूपीआय, इंटरनेट बँकिंग इत्यादी डिजिटल सुविधा पुरवणाऱ्या कंपन्यांसोबतचे करारदेखील आपल्याला तयार करावे लागतात. साधारणतः पतसंस्थांमध्ये डिजिटल सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांचा कराराचा मसुदा या त्या कंपन्याच तयार करतात. त्यातील भाषा ही थोडी तांत्रिक स्वरूपाची असल्याने ती पतसंस्थांना जशी आहे, तशीच समजते असे नाही. त्यामुळे भविष्यात एखादी दुर्घटना झाली किंवा काही अडचणी उत्पन्न झाल्यास या कराराचा फायदा हा पतसंस्थेच्या बाजूने बरेचदा नसतोच. कराराचा अर्थ An agreement is a mutual understanding between two or more parties. परंतु अशा क्लिष्ट करारांमध्ये तांत्रिक ज्ञानाचा अभाव पतसंस्थांमध्ये असल्यामुळे संस्थांची बाजू ही अंधारातच राहते.



**मंगेश देहडेकर**
**९९२१३०४८११**

साधारणतः पतसंस्थांमध्ये कोणताही करारनामा तयार करण्याची पद्धत म्हणजे इतर एखाद्या पतसंस्थेचा किंवा बँकेचा त्यासंदर्भातील करारनामा घेणे व त्या करारनाम्यावरूनच आपल्या संस्थेचा करारनामा तयार करणे अशी चुकीची पद्धत रूढ आहे. याचे कारण म्हणजे पतसंस्था या ग्रामीण आगात अधिक असल्यामुळे असे करारनामे तयार करून देणारे लॉ फॉर्म किंवा कॉर्पोरेट कंपन्या या उपलब्ध होत नाहीत आणि मग उपलब्ध साधनांमधूनच करारनाम्याची जुळवणी केली जाते. परंतु अशा प्रकारे तयार केलेले करारनामे हे करार कायद्याला, कॉन्ट्रॅक्ट ॲक्टला अनुसार तसेच आपल्या संस्थेला लागू असणाऱ्या कायद्याच्या अनुसार व बायलॉजमधील तरतुदीनुसार आहेत का? हे तपासले पाहिजे व नसतील तर आपल्या संस्थेची करोडो रुपयांची गुंतवणूक ही आपण डोळे झाक करून रिस्कमध्ये ठेवलेली आहे, असे म्हणावे लागेल.

आपण जेव्हा एखादे दुचाकी वाहन एखाद्या वित्तीय कंपनीकडून कर्ज घेऊन खरेदी करतो, तेव्हा त्या ५० हजार रुपये ते एक लाख रुपयांच्या कर्जाकरिता किमान एखाद्या शंभर पाणी करारनाम्यावरती तेवढ्याच स्वाक्षरी आपल्याला कराव्या लागतात. वास्तवात आपल्या संस्थांमध्ये आपण यापेक्षा कितीतरी अधिक रकमेचे कर्ज अगदी दहा वीस पानाच्या करारनाम्यावर स्वाक्षरी घेऊन वाटप करीत असतो, गहाण खताच्या बाबतीत तर मी अनेकदा पाहिले आहे की संस्था वा एखाद्या एजंटकडे खातेदाराला पाठवून कर्जाचे तारण गहाण खत नोंदवायला सांगतात व त्यानंतर त्यातील काही मोजकाच मजकूर तपासला जातो, कोर्टामध्ये पतसंस्थांची कर्ज वसुली ही वर्षानुवर्षे होत नाही याचे हेदेखील एक प्रमुख कारण आहे, माझ्या अनेक वर्षाच्या कार्यकाळात मी अनेकदा अनुभवलंय की कोर्ट पतसंस्थांना भरपूर व वारंवार वेळ देत असते. परंतु करारनामा या विषयाकडे पतसंस्था गांभीर्याने पाहत नाही आणि मग कायदेशीर ज्ञान असलेली व्यक्ती आपल्या पतसंस्थेला याचे गांभीर्य नाही असा समज करून घेते. कॉर्पोरेट कंपनीमध्ये काम करत असतानाचा अनुभव राहिला आहे की या कंपन्यांचे करारनामे हे सर्व बाजूने विचार करून तयार केलेले असतात आणि त्यामुळेच कोणत्याही परिस्थितीत अशा कंपन्यांचे कर्ज हे सुरक्षितच राहते, अनेकदा या कंपन्या २५%-३०% पर्यंत कर्जावर व्याजदर घेतात, तरीदेखील कोर्टातील निकाल हे या कंपन्यांच्या बाजूने लागतात, याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांचा अभ्यासपूर्ण करारनामा हे असते. कोणताही करारनामा तयार करीत असताना त्यामध्ये मुख्य मजकुराव्यतिरिक्त भविष्यात आपली संस्था सुरक्षित राहील असे काही मुद्दे अंतर्भूत केले पाहिजे जसे :-

१) फोर्स मेजर किंवा अपरिहार्य परिस्थिती म्हणजेच महामारी, युद्ध, नैसर्गिक आपत्ती इत्यादी अशा काही घटना ज्या कदाचित भविष्यात घडू शकतात व अशा परिस्थितीमध्ये शासन कायदा किंवा आपण स्वतः संस्था कर्जदार यापैकी कोणाचेच यावरती नियंत्रण राहू शकत नाही. परंतु, आपली संस्था व आपल्या असेट अशा परिस्थितीत देखील सुरक्षित राहिली पाहिजे.

२) डिस्प्यूट मॅनेजमेंट ज्या व्यक्तीबरोबर किंवा संस्थेबरोबर आपण करार करत आहोत. जर भविष्यात कोणताही वाद उद्भवला तर असा वाद हा कशा पद्धतीने व कोणत्या कायद्याअंतर्गत सोडवला जाईल, त्याची पद्धत काय असेल याचा स्पष्ट उल्लेख केला पाहिजे. कारण केवळ कायदेशीर मार्गाने वाद सोडवला जाईल, असे लिहिले असल्यास अशी प्रकरणे प्रदीर्घकाळ कोर्टामध्ये प्रलंबित राहतात.

३) गुडविल - आपल्या संस्था या सभासदांच्या विश्वासावर चालत असतात. परंतु अनेकदा आपण पाहतो की, थकित कर्जदार, किंवा एखादी अशी व्यक्ती जिच्या विरोधात संस्थेने कायदेशीर कारवाईचा मार्ग अवलंबला आहे, अशी व्यक्ती संस्थेच्या नावलौकिकास धक्का पोहोचेल असे कृत्य करीत असते. अशा कृत्यामुळे संस्थेचे झालेले नुकसान हे पैशात मोजणे कठीण कार्य असते. तसेच असे कृत्य करणाऱ्या व्यक्तीच्या विरोधात कार्यवाही करण्याकरिता संस्थेच्या करारामध्ये त्या संदर्भातील मजकूर हा समाविष्ट केलेला असावा.

४) कार्यक्षेत्राचा उल्लेख संस्थांचा किंवा संस्था ज्या व्यक्तीबरोबर करार करते, त्यांच्या व्यवसायाचा विस्तार हा कदाचित राज्य किंवा देशभर असू शकतो. अशावेळी एखादा वाद उद्भवल्यास त्या संदर्भात जी कायदेशीर कारवाई करायची आहे, ती कोणत्या कोर्टाच्या कार्यक्षेत्रामध्ये किंवा संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये केली जाईल, याचा करारात उल्लेख असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ - पुण्यामध्ये कार्यरत असलेली पतसंस्था ही एखादा कायदेशीर वादाकरिता चेन्नई येथील कोर्टामध्ये किंवा लवादासमोर वारंवार हजर राहू शकेल का?


वरील काही उदाहरणाशिवाय गोपनीयता व डेटा संरक्षण, नुकसान भरपाई वसुलीची पद्धत व नुकसानाची निश्चिती करण्याच्या पद्धती, संरक्षण व विमा संदर्भातील अटी, वारसदारांवरील बंधने, पक्षकारांना लागू असलेले कायदे इत्यादी अनेक महत्वाच्या मुद्द्यांचा समावेश संस्थेच्या कोणत्याही करारनाम्यामध्ये असावा तरच आपल्या पतसंस्था या अधिक सुरक्षित व कायद्याच्या दृष्टीने सक्षम राहतील.

**- मंगेश देहडेकर** Co-op trainer, consultant
**मो. नं. - ९९२१३ ०४८११**

*****

# तुमची माहिती, तुमचा हक्क : डिजिटल जगात सुरक्षिततेचा नवा मार्ग व आव्हाने

आजकाल डिजिटल जगात आपल्या वैयक्तिक माहितीचे (नाव, पत्ता, बँक खाते इत्यादी) संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. याच गोष्टीला लक्षात घेऊन, भारत सरकारने माहिती (डेटा) संरक्षण आणि डिजिटल गोपनीयता नियम' (DPDP नियम) आणले आहेत. या नियमांमुळे आपल्या माहितीचा वापर कसा व्हायला हवा, हे स्पष्टपणे सांगितले आहे.



अजित भाले
८००७७ ५५४५५

**लेखांक ३**

या नियमांतील महत्त्वाचा भाग म्हणजे 'परवानगी अधिकार व्यवस्था' किंवा 'कन्सेंट मॅनेजर'. हे कन्सेंट मॅनेजर म्हणजे एक मध्यस्थ, जो तुमची माहिती सुरक्षित ठेवण्यासाठी आणि तुम्ही परवानगी दिल्यावरच ती दुसऱ्यांना देण्यासाठी काम करतो. सोप्या भाषेत सांगायचे तर हे कन्सेंट मॅनेजर तुमच्या माहितीचे 'रक्षक' आहेत.

**※ कन्सेंट मॅनेजर नक्की काय करतात –**

**परवानगीचे व्यवस्थापन :** हे कन्सेंट मॅनेजर एक डिजिटल व्यासपीठ (प्लॅटफॉर्म) तयार करतात जिथे तुमची माहिती कोणाला द्यायची आणि कोणाला नाही, हे ठरवू शकता. म्हणजे, तुम्हाला तुमची परवानगी कधीही बदलता किंवा काढून घेता येते.

**माहितीची सुरक्षित देवाणघेवाण :** समजा, तुम्हाला बँकेकडून कर्ज घ्यायचे आहे. त्यासाठी बँकेला तुमच्या आधीच्या आर्थिक व्यवहारांची माहिती हवी आहे. अशा वेळी, कन्सेंट मॅनेजर तुमची परवानगी घेऊन तुमची माहिती एका बँकेकडून दुसऱ्या बँकेला सुरक्षितपणे पाठवतील. उदाहरणार्थ :- तुमच्याकडे 'डिजिटल लॉकर' (DigiLocker) आहे, जिथे तुम्ही तुमची महत्त्वाची कागदपत्रे ठेवली आहेत. जर एखाद्या सरकारी कार्यालयाला ती कागदपत्रे हवी असतील, तर कन्सेंट मॅनेजर तुम्हाला विचारतील आणि तुम्ही परवानगी दिल्यावरच ती कागदपत्रे त्यांना मिळतील. तुमची एका बँकेतील माहिती दुसऱ्या बँकेत पाठवायची असल्यास, रिझर्व्ह बँक अधिकृत कन्सेंट मॅनेजर तुमची आधी परवानगी घेऊन ती माहिती सुरक्षितपणे पाठवतील.

**※ तुमच्या हातात ताकद –**

आता तुमची माहिती तुमच्या नियंत्रणात असेल. तुम्हीच ठरवू शकाल की, तुमची कोणती माहिती द्यायचीय, कशासाठी द्यायचीय, तुमची संमती आहे का, माहिती किती वेळासाठी द्यायचीय, कोणाला द्यायची आणि कोणाला नाही. यामुळे, तुमच्या गोपनीयतेचे संरक्षण होईल आणि डिजिटल जगात तुम्ही अधिक सुरक्षित राहाल.

**※ कन्सेंट मॅनेजर आणि ग्रामीण भागातील आव्हाने :-**

कन्सेंट मॅनेजरची भूमिका महत्त्वाची असली, तरी ग्रामीण भागातील लोकांसाठी ते सहज उपलब्ध नसतील, अशी शक्यता आहे. विशेषत: जिथे डिजिटल साक्षरता कमी आहे आणि लोकं व्यवहारांसाठी नातेवाईक किंवा ओळखीच्या व्यक्तींवर अवलंबून असतात. अशा परिस्थितीत, लोकांची माहिती सुरक्षित ठेवणे एक मोठे आव्हान आहे. दिलेली संमती खरोखर योग्य व्यक्तीचीच आहे हे ठरवता येणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात, अनेक लोकं डिजिटल माध्यमांचा वापर करण्यास अनभिज्ञ असतात. ते त्यांच्या माहितीचा वापर कसा आणि कुठे होतो, हे समजू शकत नाहीत. त्यामुळे, त्यांची माहिती त्यांच्या नकळत वापरली जाण्याची दाट शक्यता असते. अशा परिस्थितीत, कन्सेंट मॅनेजरची ग्रामीण भागातील उपयुक्तता आणि भूमिका तपासून बघणे अधिक महत्त्वाचे ठरते.

कन्सेंट मॅनेजरची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांनी ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या हक्कांबद्दल आणि माहितीच्या सुरक्षिततेबद्दल आणि वापराच्या योग्य पद्धतीबद्दल शिक्षित करणे खूप आवश्यक आहे. लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी स्थानिक भाषांमध्ये माहिती देणे, कार्यशाळा आयोजित करणे आणि स्थानिक कार्यकर्त्यांची मदत घेणे आवश्यक आहे. लोकांनी स्वतःहून माहिती देण्यास सक्षम व्हावे किंवा माहिती देण्यास मदत करणाऱ्या व्यक्तींकडून पारदर्शक आणि माहितीपूर्ण निर्णय घ्यावा यासाठी सामूहिक आणि तंत्रज्ञानाचे सुकर प्रयत्न करणे आवश्यक आहे. यामुळे ग्रामीण भागातील लोकांची माहिती सुरक्षित राहील आणि ते डिजिटल जगात अधिक सुरक्षितपणे सहभागी होऊ शकतील.

**※ अंमलबजावणीतील आव्हाने आणि उपाय : –**

भारतीय बाजारात या नियमांची अंमलबजावणी करताना अनेक आव्हाने आहेत.

**डिजिटल साक्षरता :** लोकांना डिजिटल गोष्टी शिकवणे हे एक दीर्घकालीन आणि आव्हानात्मक काम आहे.

**विश्वासार्हता :** लोकांना सरकार आणि कन्सेंट मॅनेजर यांच्यावर विश्वास ठेवण्यास प्रवृत्त करणे आवश्यक आहे. यासाठी पारदर्शकता आवश्यक आहे.

**आर्थिक गुंतवणूक :** या प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी बँकेकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक आवश्यक आहे. भारतात अनेक भाषा असल्यामुळे, सर्व भाषांमध्ये माहिती उपलब्ध करून देणे हे एक मोठे आव्हान आहे.

**※ उपाय –**

**सरळ आणि सुलभ माहिती :** लोकांना त्यांच्या स्थानिक भाषांमध्ये सोप्या आणि स्पष्ट भाषेत माहिती पुरवणे.

**स्थानिक सहाय्यक :** स्थानिक शिक्षक, अंगणवाडी सेविका आणि इतर जाणकार व्यक्तींना प्रशिक्षण देऊन त्यांना तंत्रज्ञानातील संमती देणाऱ्याचे मदतनीस म्हणून नियुक्त करणे.

**ऑफलाइन सहाय्य :** पोस्ट ऑफिस, बँका आणि सरकारी कार्यालयांमध्ये ऑफलाइन मदतनीस केंद्रे स्थापन करणे. विश्वास निर्माण करणे : पारदर्शक आणि जबाबदार कार्यप्रणालीद्वारे लोकांचा विश्वास संपादन करणे.

**संकल्पना प्रकल्प :** मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करण्यापूर्वी लहान गावांमध्ये उदाहरणादाखल प्रकल्प राबवून अनुभव घेणे.

सरकारने आणलेल्या या नियमांमुळे आपली माहिती सुरक्षित राहील आणि तिचा वापर काळानुरूप आपल्या परवानगीनेच होईल, याची वाटचाल निश्चित होते आहे. मात्र, ग्रामीण भागातील लोकांपर्यंत हे बदल, नियम, उपयुक्तता पोहोचवणे आणि त्यांना डिजिटली साक्षर करणे, हे एक मोठेच आव्हान आहे. या आव्हानाचा सामना करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**– साभार, अजित अभयकुमार भाले**
संस्थापक, मेट्टारेव सिस्टीम्स, पुणे
Mettarev Systems ajit.bhalemettarev.com
**मो. नं. – ८००७७ ५५४५५** *****

# सहकारी संस्थांमधील सभासद व ग्राहक साक्षरता

महाराष्ट्र हे सहकार सर्वाधिक रुजलेले राज्य आहे. सर्वाधिक सहकारी संस्था महाराष्ट्रात आहेत. साखर कारखाने, दूध उत्पादक संघ, विणकर, मच्छिमार सोसायटी आणि त्याच बरोबर पतसंस्था, बँका अशा प्रकारच्या आर्थिक संस्था महाराष्ट्रात सर्वाधिक आहेत. या संस्थांपेक्षा आर्थिक सहकारी संस्था यांचे स्थान विशेष महत्वाचे आहे. कारण त्या विश्वस्तवृत्ती, संचालकांचा विश्वास आणि पारदर्शी कारभार यांचे जोरावर मोठ्या होतात.

सहकार ही एक जीवनशैली आहे. आपल्या समान गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने आणि सहकाराची मूलतत्त्वे पाळून चाललेली संस्था म्हणजे सहकारी संस्था. संयुक्त प्रयत्नांतून एक समान ध्येय गाठण्यासाठी एकत्र आलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे सहकार होय. सहकार ही व्यापक चळवळ असून यात समान गरजा असलेल्या व्यक्ती, समान आर्थिक उद्दिष्टांसाठी, स्वेच्छेने संघटित झालेल्या असतात. खरे तर ग्रामीण भागातील गरीब, गरजू लोकांना सावकारी पाशातून सोडवून त्यांच्यात पत निर्माण करण्यासाठी सहकारी तत्त्वावर पतसंस्था आणि सहकारी बँका यांचा उदय झाला. सहकाराची सात मूलतत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत. भारतातील सहकारी चळवळीने ती स्वीकारली आहेत. ऐच्छिक आणि खुले सभासदत्त्व, सभासदांचे लोकशाही नियंत्रण, अर्थव्यवहारात सभासदांचा सहभाग, स्वयंशासन आणि स्वातंत्र्य, शिक्षण प्रशिक्षण आणि माहिती, सहकारांतर्गत सहकार आणि सामाजिक जाणीव व बांधिलकी अशी सात मूलतत्त्वांचे आधारावर कोणतीही सहकारी संस्था चालावी, अशी अपेक्षा आहे.



**अविनाश जोशी**
**९८१९३ २९७५०**

**※ गुड गव्हर्नन्स ही संकल्पना महत्त्वाची –**

कोणत्याही सहकारी संस्थेत लोकशाही नियंत्रण म्हणजे लोकशाही पद्धतीने निवडून दिलेले सभासद म्हणजेच संचालक, हे त्या संस्थेचा कारभार दररोज पाहत असतात. संस्था संचालन म्हणजेच गुड गव्हर्नन्स ही संकल्पना महत्त्वाची आहे. संस्थेचे सर्व हितसंबंधी घटकांना एकत्र करून त्यांचे हित जोपासणे, हे काम संस्था संचालनात अपेक्षित आहे. आर्थिक सहकारी संस्थेत म्हणजेच पतसंस्था वा सहकारी बँका यामध्ये प्रथम भागधारक, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक, कर्मचारी, संचालक, नियंत्रक या सर्वांचे हितसंबंध जपणे म्हणजे संस्था संचालन होय. याची प्रमुख जबाबदारी संस्थेचे दैनंदिन कारभारावर नियंत्रण ठेवणाऱ्या संचालक मंडळाची आहे. अभ्यासू वृत्तीने, विश्वस्तांचे भावनेतून पारदर्शी व्यवहार ठेवले तरच सहकारी आर्थिक संस्था उत्तम कारभार करू शकतील. भांडवल पुरवणारे भागधारक यांचे हित त्यांना दरवर्षी मिळणाऱ्या परताव्यावर म्हणजेच लाभांश किंवा डिव्हिडंड यामध्ये आहे. त्यामुळे संस्था नफ्यात चालते तेव्हाच त्यांना लाभांश मिळेल.

**※ ग्राहक वा सभासदांची साक्षरता महत्त्वाची –**

संस्थेतून दिल्या जाणाऱ्या अनेकविध सेवांचा लाभ घेणारे ग्राहक आणि त्यांना देण्यात येणारी विनम्र आणि तत्पर सेवा हेच सहकारात काम करणाऱ्या आर्थिक संस्थांचे खरे भांडवल आहे. ग्राहकांचे विश्वासास तडा जाणार नाही, याची काळजी संचालक मंडळाने केली, तरच सहकारी संस्था वाढतील आणि याही अडचणीचे काळात तगून राहतील. प्रमुख हितसंबंधी म्हणजेच भागधारक, कर्मचारी आणि संचालक हे प्रशिक्षित असले पाहिजेत, त्यासाठी घटना दुरुस्तीने कायद्यात २४ अ हे नवे कलम समाविष्ट करून या तीनही घटकांचे प्रशिक्षण संस्थांवर बंधनकारक केले आहे. त्यामुळेच ग्राहक वा सभासदांची साक्षरता ही सहकारी आर्थिक संस्थांमध्ये अत्यंत महत्त्वाची आहे.

सभासद आणि ग्राहक हे जागरूक आणि प्रशिक्षित असणे, ही सहकाराची गरज आहे. कोणत्याही सहकारी आर्थिक संस्थेत म्हणजेच पतसंस्था वा सहकारी बँकेत ग्राहकाची व्याख्या ही अगदी सोपी आहे. त्या संस्थेत दिल्या जाणाऱ्या सोयी वा सुविधांचा लाभ घेण्यासाठी येणारी प्रत्येक व्यक्ती ही पतसंस्था वा सहकारी बँकेची ग्राहक आहे. या सुविधा देतानाच तत्पर आणि विनम्र सेवा देणे, हेच सहकारी संस्थांचे भांडवल आहे. कारण ग्राहकांमुळेच मिळणाऱ्या व्यवसायातून नफा क्षमता वाढते. जेवढी नफा क्षमता अधिक, तेवढे निधी संकलन अधिक होईल, जेवढा निधी (रिझर्व्हस) वाढेल तेवढी स्वनिधीमध्ये वाढ होऊन संस्था आर्थिकदृष्ट्या सदृढ-सशक्त होईल. वसूल भाग भांडवल आणि मुक्त निधी म्हणजे फ्री रिझर्व्हज, ही स्वनिधीची व्याख्या आहे. स्वनिधी जेवढा अधिक, तेवढी जोखीम पेलण्याची संस्थेची शक्ती अधिक असते. त्यामुळे व्यवसाय वाढ म्हणजेच व्यावसायिकता आणि नफा क्षमता या प्रमुख गोष्टीवर लक्ष केंद्रित करून ग्राहक सेवेला महत्व देणे, हाच संख्या वाढीचा रामबाण उपाय आहे.

**※ ग्राहकासमोर अनेक पर्याय उपलब्ध –**

ग्राहकासमोर अनेक पर्याय उपलब्ध आहेत. ग्राहक संरक्षण मंच आणि कायद्याचेही संरक्षण त्यांना उपलब्ध आहे. त्यांना इतर आर्थिक संख्या अनेकविध प्रलोभने दाखवून आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे आपला ग्राहक दुसरीकडे जाणार नाही, त्याचे तक्रारीचे निवारण लवकर आणि त्यास समाधान देणारे, कसे होईल, याची काळजी संस्थांनी यापुढे अधिक घेणे गरजेचे आहे. तसेच ग्राहकांनीही अधिक जागरूक आणि सतर्क राहणे, अभ्यासू वृत्तीने संस्थेच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊनच गुंतवणूक करणे, ही आता काळाची गरज आहे. संस्थांनी आपल्या ग्राहकाला प्रशिक्षित व साक्षर करून त्यास सतत नवनवीन माहिती, ज्ञान देऊन अधिक प्रगल्भ केले पाहिजे. यासाठी ग्राहक साक्षरता मेळावे आयोजित करून कायद्याची, आपल्या सोयीसुविधांची त्यास अद्ययावत माहिती देणे, ही संस्था संचालकांची जबाबदारी आहे.

ठेव ठेवताना संस्थेची सशक्तता व सुदृढता याची त्यास माहिती असणे, गरजेचे आहे. कर्ज व्यवहार करताना कर्ज मंजुरीच्या अटी, शर्ती, मुदत, व्याजदर, कागदपत्रांची पूर्तता यांची संपूर्ण माहिती आणि त्यासाठी त्यांची संमती घेणे, या गोष्टींबाबत संस्थेने त्यास अवगत करणे गरजेचे आहे. कर्ज रोख्यामध्ये आपण काय लिहून दिले आहे. आपली जबाबदारी काय, कारण आणि तारण यांची पूर्ण माहिती, जामीनदार, गहाणखत याबाबत संपूर्ण माहिती कर्जदारास सांगणे आता खूप गरजेचे बनले आहे. कर्ज वितरणाअगोदर कर्जदारास ही सर्व माहिती देणे आवश्यक आहे. बँकेच्या/ संस्थेच्या वेबसाईटवर ग्राहकांना तक्रार नोंदवण्याची सोय उपलब्ध झाली पाहीजे. त्यांचे तक्रारीबाबत त्वरित कार्यवाही करून त्यास समाधानकारक उत्तर देणे गरजेचे आहे. कोणीही ग्राहक मग तो ठेवीदार, कर्जदार वा इतर सोयी सुविधांचा लाभ घेणारा असो, तो पतसंस्था वा बँकेच्या नजरेच्या टप्प्यात असला पाहिजे म्हणजे आपला ग्राहक ओळखा किंवा केवायसी हे तत्त्व पाळले पाहिजे. कारण

पुढील पानावर...

# सहकार भारती आयोजित पापड महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद



**सांगली –** सहकार भारती, सांगली महानगर आणि जिल्हा शाखा व आदि आरिहंत अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी यांचे संयुक्त विद्यमाने येथे आयोजित करण्यात आलेल्या पापड महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तसेच आदिआरिहंत अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी यांचे वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबिर व मोफत नेत्र तपासणी शिबिर यांचे आयोजन करण्यात आले होते. पापड महोत्सवाचे उद्घाटन जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांचे हस्ते झाले.

आदि आरिहंत अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष आदिनाथ नसलापुरे, क्रेडाई महाराष्ट्राचे जॉइंट सेक्रेटरी रवींद्र खिलारे, सहकार भारतीचे महामंत्री शैलेश पवार, जिल्हा प्रचार व प्रसिद्धी प्रमुख संदीप कुलकर्णी, जिल्हा महामंत्री भारत निकम, धीरज नसलापुरे, बाळासाहेब खुडे, अमोल बोळाज, महिला पदाधिकारी उत्कर्षा लाडे, सारिका मुळे, संपदा अरवाडे, सुषमा कुलकर्णी, श्रुती जोशी उपस्थित होते.

## भीमाशंकर साखर कारखाना देशात सर्वोत्कृष्ट

**पुणे –** पुणे जिल्ह्यातील भीमाशंकर सहकारी साखर कारखाना देशामध्ये सर्वोकृष्ट कारखाना ठरला आहे. दिल्ली येथील राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाच्या वतीने पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी पुरस्कार जाहीर केले.

महासंघाच्या वतीने एकूण २५ पुरस्कार जाहीर करण्यात आले. त्यामध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक १० पुरस्कार मिळविले आहेत. ५ पुरस्कार प्राप्त करणारे तामिळनाडू दुसऱ्या स्थानावर आणि ४ पुरस्कारासह उत्तर प्रदेश तिसऱ्या स्थानावर आहे. तसेच गुजरात राज्य देखील चौथ्या स्थानावर आहे. पंजाब, हरियाणा, मध्य प्रदेश राज्यांना प्रत्येकी एक पुरस्कार जाहीर करण्यात आला. देशातील सर्व म्हणजे २६० सहकारी आणि आणि ९ राज्यातील साखर संघ हे महासंघाचे सदस्य आहेत. पुरस्कार निवडीसाठी केंद्रीय सहकार सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती तयार करण्यात आली होती. महासंघाच्या वतीने एक दिवसीय साखर उद्योगाची साखर परिषद आयोजित करण्यात येणार आहे असे त्यांनी सांगितले.

## लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी विभागीय कार्यालयाचा वर्धापनदिन साजरा

**पुणे –** येथील लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटीच्या विभागीय कार्यालयाचा वर्धापनदिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किरण ठाकुर उपाध्यक्ष अजित गरगट्टी, संचालक गजानन घामणेकर, विभागीय व्यवस्थापक सुशील जाधव आदी यावेळी उपस्थित होते. सोसायटीचे खातेदार, हितचिंतक तसेच नागरिक ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटीच्या कर्वेनगर शाखेचे स्थलांतर

**पुणे –** लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटीच्या कर्वेनगर शाखेचे स्थलांतर राज्यसभा खासदार प्रा. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. सोसायटीचे संस्थापक किरण ठाकुर आणि सोसायटीच्या पुणे विभागाचे प्रमुख सुशील जाधव तसेच अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते. लोकमान्य फौंडेशनच्या माध्यमातून लोकमान्य समूहाने हाती घेतलेल्या विविध उपक्रमाचा गौरवपूर्ण उल्लेख खासदार कुलकर्णी यांनी मनोगतात केला.

## सांगली अर्बन को-ऑप. बँकेने केला २००० कोटींचा व्यवसायाचा टप्पा पार

**सांगली –** सांगली अर्बन को-ऑप. बँकेने नुकताच २००० कोटींचा एकत्रित व्यवसायाचा टप्पा पार केला आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष गणेश गाडगीळ यांनी सांगितली. बँकेच्या ठेवींमध्ये वाढ होऊन एकूण ठेवी १२५० कोटी झाल्या असून कर्जामध्ये वाढ होऊन आजवर ७६० कोटी कर्जांचे वाटप करण्यात आले आहे. बँकेच्या एकूण व्यवसायात वाढ होऊन २००० कोटीचा टप्पा पूर्ण झाला आहे.

व्यवसाय वाढीसाठी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, सर्व कर्मचारी वर्ग, सहकारी संचालक, व्यवस्थापन मंडळ सदस्य यांची साथ व सहकार्य मिळाल्याने बँकेची प्रगती होऊन व्यवसायाचा दोन हजार कोटींचा टप्पा पूर्ण झाला आहे.

मागील पानावरून...

## सहकारी संस्थांमधील सभासद व ग्राहक साक्षरता

जसा ग्राहक हा व्यवसाय देणारा घटक आहे. तसेच त्याचेपासून संस्थेस जोखीम (रिस्क) पोहोचू शकते. त्यामुळे केवायसी नियम पूर्णतः पाळून त्याची संपूर्ण माहिती करून घेतली पाहिजे.

**❊ विविध उपक्रमांचे आयोजन करणे आवश्यक –**

ग्राहकांना आणि भागधारकांना पतसंस्थेची वा बँकेची संपूर्ण माहिती असणे गरजेचे आहे. वार्षिक अहवालातील नफा तोटा पत्रक ताळेबंद, परिशिष्टे तसेच त्याबाबतची दिलेली माहिती (डिस्क्लोजर्स) अभ्यासले पाहिजेत. ग्राहकांना साक्षर करणे, ही जशी संस्थेची जबाबदारी आहे. तसेच स्वत: ग्राहकाने अभ्यासू वृत्तीने संस्थेची ओळख माहिती करून घेणे आणि आपली संस्था आर्थिकदृष्ट्या सदृढ, सशक्त आहे ना याची खात्री करून घेणे ही काळाची गरज आहे. सर्वच सहकारातील आर्थिक संस्थांनी विशेषत: पतसंस्था व सहकारी बँकांनी पुढाकार घेऊन ग्राहकांचे आर्थिक साक्षरतेसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण, अभ्यासवर्ग, ग्राहक मेळावे यांद्वारे प्रबोधन करावे.

संकेतस्थळ जाहिराती, पत्रके, फ्लेक्स यांद्वारे त्यांना सतत बदलत्या सोयी सुविधांची माहिती देणे हे गरजेचे आहे. त्यासाठी संचालक मंडळाने विशेष कार्यक्रम राबवून हितसंबंधी घटकांना विशेषतः भागधारक, ठेवीदार, कर्जदार आणि ग्राहकांना सुशिक्षित आणि साक्षर बनविण्याचे काम जाणीवपूर्वक करणे, अत्यंत गरजेचे आहे.

**– अविनाश जोशी, निवृत्त अधिकारी,**
**भारतीय रिझर्व्ह बँक, व्यवस्थापक मंडळ सदस्य,**
**वाई अर्बन बँक. मोबाईल नं. – ९८१९३२९७५०** ❊❊❊

# सांगली अर्बन को-ऑप. बँकेचे संस्थापक कै. अण्णा गोडबोले यांना अभिवादन



**सांगली –** सांगली अर्बन को-ऑप. बँकेचे संस्थापक कै.म.ह तथा अण्णा गोडबोले यांच्या १२० व्या जयंती प्रित्यर्थ बँकेच्या प्रधान कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. बँकेचे अध्यक्ष गणेश गाडगीळ व संचालक यांच्या हस्ते संस्थापक कै.म.ह. तथा अण्णा गोडबोले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

संचालक संजय धामणगांवकर यांनी प्रास्ताविक केले. संचालक एच. वाय पाटील, संजय पाटील, शैलेंद्र तेलंग, संजय धामणगांवकर, मुख्य कार्यकारी अधिकारी उल्हास नायक, सरव्यवस्थापक वासुदेव दिवेकर, उपसरव्यवस्थापक आनंद एकबोटे आणि विभाग प्रमुख, अधिकारी वर्ग उपस्थित होते.

## पुणे पीपल्स सहकारी बँकेचा सहकार सप्ताह साजरा

**पुणे –** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून येथील पुणे पीपल्स सहकारी बँकेच्या वतीने दि. ८ ते १५ मार्च या कालावधीत सहकार सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

संचालिका श्वेता ढमाळ यांनी उपस्थित प्रतिनिधींना सायबर सुरक्षा याबाबत मार्गदर्शन केले. बँक अध्यक्ष सीए जनार्दन रणदिवे यांनी बँकेच्या विशेष व्याजदराच्या ठेव योजनांची. महिला बचत गटासाठी बँकेच्या वतीने कार्यान्वित करण्यात आलेल्या कर्ज योजनांची तसेच रिक्षासाठीच्या विविध कर्ज योजनेची माहिती माजी अध्यक्ष ॲड. सुभाष मोहिते यांनी सांगितली. महिलांच्या आरोग्य विषयक समस्यांसाठी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

## राज्य सहकारी बँकेला रोखे वितरणास अनुमती

**पुणे –** राज्य सहकारी बँकेच्या कार्यपद्धती लक्षात घेऊन सर्व सहकारी संस्थांनी कार्यपद्धतीमध्ये बदल करावा, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. आरबीआयने राज्य सहकारी बँकेस ५०० कोटींच्या रोखे वितरणास अनुमती दिली असून त्याचा प्रारंभ झाला. त्यावेळी ते बोलत होते.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, राज्यमंत्री पंकज भोयर, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर आदी उपस्थित होते. बँकेचे रोखे दहा वर्षाच्या मुदतीचे असून त्यावर दर साल दर शेकडा ८.५० टक्के दराने परतावा मिळणार आहे. या रोख्यांमध्ये सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था, साखर कारखाने, ट्रस्ट, व्यक्तीगत गुंतवणूकदार यांना लाभ घेता येणार आहे. प्रशासक अनास्कर यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेतला. सूत्र संचालन राजेंद्र पाटणकर यांनी केले.

## राज्यस्तरीय सहकार समितीवर अनास्कर, कोयटे व पटवर्धन



विद्याधर अनास्कर



काका कोयटे



सुहास पटवर्धन

**पुणे –** राज्याच्या विविध भागात आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष साजरे करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली समिति तयार करण्यात आली असून या समितीमध्ये बँकिंग तज्ञ विद्याधर अनास्कर आणि महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण महासंघ अध्यक्ष सुहास पटवर्धन आणि राज्य सहकारी पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष काका कोयटे यांची निवड करण्यात आली आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहीर केले आहे. त्यानिमित केंद्रीय सहकार मंत्रालयाने वर्षभर विविध उपक्रम करण्याचे ठरविले आहे. या उपक्रमाची राज्याच्या विविध भागात अंमलबजावणी करण्यासाठी समिती काम करणार आहे. या समितीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील तसेच विविध खात्याचे मंत्री, मुख्य सचिव आदींचा समावेश करण्यात आला आहे.

## लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटीचा डेंटल वन हॉस्पिटलबरोबर सामंजस्य करार

**पुणे –** येथील लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटीच्या वतीने डेंटल वन हॉस्पिटलबरोबर सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे सोसायटीच्या ग्राहकांना सवलतीच्या दरात दंतचिकित्सा करता येणार आहे. त्याचप्रमाणे सवलतीच्या दरात दातावर विविध उपचार आणि चाचण्या करता येणार आहेत.

सोसायटीच्या सदस्यांना ४० टक्के आणि त्यांच्या कुटुंबियांना २५ टक्के सवलत देण्यात येणार आहे, अशी माहिती पुणे विभागीय प्रमुख सुशील जाधव यांनी सांगितली. या कराराचा फायदा सोसायटीच्या सदस्यांना होणार असल्याची माहिती यावेळी सांगण्यात आली.

# नंदुरबार सहकार भारती प्रशिक्षण शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**नंदुरबार –** 'बिना सहकार नही उद्धार' हे ब्रीदवाक्य घेत महिला दिनाचे औचित्य साधून येथील सहकार भारतीच्या नंदूरबार जिल्हा शाखेतर्फे घेण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यशाळेस महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

ओडिसा राज्यातून आलेले सहकार भारतीचे राष्ट्रीय कार्यालय प्रमुख लक्ष्मण पात्रा यांनी महिलांनी घरगुती २०३ गृह उद्योग व्यवसाय सुरू करण्यासंदर्भात प्रात्यक्षिकासह डेमो दाखवून महत्त्वपूर्ण माहिती सांगितली. प्रास्ताविक सहकार भारतीच्या महिला जिल्हा संघटन प्रमुख सुरेखा वळवी यांनी केले. भारत मातेच्या प्रतिमेस तनुश्री बडगुजर व सुरेखा वळवी यांनी पुष्प अर्पण केले. प्रमुख अतिथी म्हणून सहकार भारतीचे नाशिक विभाग प्रमुख बन्सीलाल अंदोरे होते. या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष कालिदास पाठक, महामंत्री रवींद्र पाटील, संघटनमंत्री महादू हिरणवाळे, जिल्हा सदस्य रोहिदास सौपुरे यांनी केले. या प्रशिक्षण शिबिरास जळगाव जनता बँकेच्या नंदुरबार शाखेचे सहकार्य लाभले.

एक दिवसीय महिला प्रशिक्षण कार्यशाळेस धनश्री जोशी, प्रीती बडगुजर, राजश्री जावरे, नीता पवार, ज्योत्स्ना कासार, कल्पना बडगुजर, वासंती सैंदाणे, निर्मला चौधरी, मनीषा भावसार, दिपाली भावसार, करिष्मा सौपुरे, जयश्री सौपुरे, नम्रता जाधव तसेच प्रल्हाद भावसार, बाबुलाल माळी, अरुण सोनार उपस्थित होते. तनुश्री बडगुजर हिने सूत्रसंचालन तर आभार सुधाकर धामणे यांनी मानले. प्रशिक्षण कार्यशाळेस महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## येवला मर्चंट बँकेच्या अध्यक्षपदी पूजा काबरा, उपाध्यक्षपदी सारीका दिवटे

**नाशिक –** दि येवला मर्चंट बँकेच्या अध्यक्षपदी पुजा काबरा तर उपाध्यक्षपदी सारीका दिवटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. बँकेच्या विस्तारीत इमारतीचे उद्घाटन तात्कालिक परराष्ट्रीय मंत्री भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते करण्यात आले होते.

सोनेतारणात बँक चार जिल्ह्यात आघाडीवर असून सभासद, खातेदारांचा बँकेवर विश्वास असल्याने नोटबंदी काळात, कोरोनाच्या संक्रमण काळातही बँकेने सर्व घटकांना उत्तम सेवा प्रदान केली. बँकेच्या डॉ. केशव बळीराम हेडगेवार सभागृहात सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक कार्यक्रम वर्षभर सुरू असतात.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न

**जळगाव –** जिल्हा माध्यमिक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने दहावी आणि बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या २२५ गुणवंत पाल्यांचा गौरव करण्यात आला. माजी शिक्षणाधिकारी नीलकंठ गायकवाड, प्राचार्य डॉ. अनिल झेपे, शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण, संस्थेचे अध्यक्ष एम. डी. भिरुड आदी यावेळी उपस्थित होते.

पतसंस्थेच्या वतीने अनेकविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतात. आणि त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद ग्राहक आणि नागरिकांकडून मिळतो.

## जळगाव जनता सहकारी बँक आणि सेवा भारती वतीने जलसेवा सुविधा उपलब्ध

**जळगाव –** जळगाव जनता सहकारी बँक आणि सेवा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने खोटेनगर परिसरात जलसेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. सेवा भारती देवगिरी प्रांताचे सचिव डॉ. आनंद फाटक तसेच बँकेचे अध्यक्ष, पदाधिकारी, संचालक, अधिकारी, कर्मचारी, नागरिक यावेळी उपस्थित होते. जलसेवेच्या सुविधेबद्दल संबंधित परिसरातील तसेच अन्य भागातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

## पूर्णवादी सहकारी बँकेला ८ कोटी ७६ लाख नफा

**बीड –** पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेने प्रतिवर्षीप्रमाणे आर्थिक कामगारीचा आलेख उंचावत ठेवला आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेला ८ कोटी ७६ लक्ष एवढा भरघोस नफा झाला आहे. बँकेचे जेष्ठ संचालक डॉ. अरुण निरंतर यांच्या मार्गदर्शनाखाली व नूतन अध्यक्ष डॉ. सुभाष जोशी यांचे नेतृत्वात बँकेने कामगिरी उंचावली आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत १ कोटी २० लाख वाढ झाली आहे. आर्थिक वर्षाअखेर बँकेच्या एकूण ठेवी रू. ८९७.१८ कोटी एवढ्या असून कर्जे रू.५३७.४४ कोटीची आहेत. बँकेचा एकत्रित व्यवसाय १४३४.६२ कोटींचा झाला असून एकत्रित व्यवसायात ११० कोटींची वाढ झाली आहे. भागभांडवल रू.२८.४८ कोटी असून बँकेची नेटवर्थ रू. ६३.६७ कोटी एवढी आहे तर बँकेच्या नेट एन.पी.ए.चे प्रमाण केवळ ०.६० टक्के इतके आहे. ही माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी यांनी सांगितली सर्व सभासद, ग्राहक, संचालक व सर्व कर्मचारी योगदान आहे.

बँकेचे अध्यक्ष डॉ.जोशी यांच्या नेतृत्वाखाली तसेच उपाध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत पारनेरकर व बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चे अध्यक्ष सी. ए. एस.पी. लड्डा व सर्व संचालक यांचे साथीने बँकेने सर्व आघाडींवर प्रगती साधून ग्राहकांचा बँकेवरील विश्वास अभेद्य ठेवून केलेली कामगिरी केली आहे.

## नाशिक सहकार भारतीच्या वतीने १२ व १३ एप्रिलला पापड महोत्सवाचे आयोजन

**नाशिक –** सहकार भारती आणि राणी भवन यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या दि १२ आणि १३ एप्रिल या कालावधीत पापड महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून उद्योजक आणि महिला बचत गटांना हक्काचे व्यासपीठ मिळणार आहे.

सहकार भारतीचे प्रदेश संघटन मंत्री शरद जाधव आणि नाशिक शाखा अध्यक्ष डॉ. प्रशांत पुरंदरे यांनी ही माहिती सांगितली. ते म्हणाले, या महोत्सवात विविध प्रकारचे खाद्य पदार्थ तसेच पापडाचे विविध प्रकार उपवासाचे पदार्थ, शेवया, बटाटा खिस, कुरडई ग्राहकांसाठी उपलब्ध असणार आहे.

# सुरक्षित / असुरक्षित कर्जे - सुरक्षिततेला प्राधान्य हवे

बँक/पतसंस्थांचा मुख्य उद्देश ठेवी स्विकारणे व कर्ज देणे हा असून या संस्था ठेवीदार सभासद यांचे विश्वस्त म्हणून काम करीत असल्याने साहजिकच त्यांनी विश्वासावर गोळा केलेल्या निधीचा विनियोग हा जास्तीत जास्त सुरक्षित कसा असेल यावर त्यांनी लक्ष केंद्रित करणे हे आवश्यक असते. किंबहुना ते त्यांचे कायदेशीर कर्तव्य असते. ठेव रूपाने गोळा झालेल्या पैशांचे कर्जरूपी वितरण करताना सुरक्षितता म्हणून जे तारण घेतले जाते, त्या तारणी मालमत्तेवर रीतसर संस्थेचा / बँकेचा भार / बोजा निर्माण झालेला असेल तरच अशी कर्जे सुरक्षित समजली जातात. प्रस्तुत लेखात आपण वित्तीय संस्थेचे कर्ज व्यवहार, तारण मालमत्तेवरील बोजा व त्याचे प्रकार यावर चर्चा करू या.



संतोष मानूरकर
९८५०७ ८३९८३

❊ **सुरक्षित / तारण कर्ज** (Secured Loans):-

सुरक्षित / तारणी कर्जाची व्याख्या बँकिंग नियमन कायदा १९४९ च्या कलम पाच (एन) मध्ये दिली असून ती खालील प्रमाणे.

Secured loan or advance means a loan or advance made on a security of assets the market value of which is not at any time be less than the amount of such loan or advance unsecured loan or advance means a loan or advance not so secured

सुरक्षित/तारणी कर्ज म्हणजे असे कर्ज जे मालमत्तेच्या तारणावर दिलेले असते व ज्याची किंमत कोणत्याही वेळी अशा कर्ज रकमेपेक्षा कमी असत नाही. सुरक्षित / तारणी कर्जाची व्याख्या पाहता त्यात कर्जदाराने बँकेच दिलेल्या दृश्य तारणी मालमत्तेची (Tangible Assets) किंमत ही कोणत्याही वेळी कर्ज रकमेपेक्षा कमी नसावी, ही प्रमुख बाब असून रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कर्जाची मुद्दल रक्कम व व्याज रक्कम पूर्णतः तारण मालमत्तेतून वसूल होणे जोगी असल्यास अशा कर्जास पूर्ण सुरक्षित (Fully Secured) कर्ज मानले जाते.

पतसंस्थेने / बँकेने कर्जदाराच्या मालमत्तेवर रीतसर बोजा (duly charge) लावलेला असणे व अशा बोजामुळे अशा मालमत्तेत बँकेचा हितसंबंध निर्माण झालेला असणे ही बाब या ठिकाणी महत्त्वाची असून कर्जासाठी कर्जदाराने कोणत्या प्रकारची मालमत्ता दिली आहे म्हणजे चल की अचल मालमत्ता यावरून बोजाचे विविध प्रकार पडत असून ते पुढील प्रमाणे :-

**(अ) स्थिर बोजा :-** (Fixed charge) कर्जदारांच्या निश्चित अशा मालमत्तेवर कराराप्रमाणे योग्य ती दस्तऐवजे निष्पळवत करून बँक जो बोजा निर्माण करते त्यास स्थिर बोजा असे म्हणतात.

**(ब) तरता बोजा :** (Floating charge) कर्जदाराचा स्टॉक माल, कच्चे सामग्री, व्यापारी येणे इ. वर बँक कराराप्रमाणे जो बोजा निर्माण करते त्यास तरता बोजा असे म्हणतात. कच्चे सामग्री स्टॉक माल सतत बदलत असल्याने असा बोजा हा सतत तरता राहतो.

**❊ धारणाधिकार व बोजाचे प्रकार खालीलप्रमाणे:-**

**१. धारणाधिकार :-** (Lien) - भारतीय करार कायद्याच्या कलम १७० व १७१ मध्ये अनुक्रमे बँकेच्या विशेष व सामान्य धारणाधिकाराची व्याख्या दिलेली आहे

**२. सामान्य धारणाधिकार** (General Lien): - एखाद्या ग्राहकाचे बँकेत ठेव खाते व कर्ज खाते असल्यास बँकेस कर्ज खात्यातील येणेबाकीपोटी अशा ग्राहकाच्या ठेव खात्यावर सामान्य धारणाधिकार असतो व मग अशा अधिकारात बँक अशा ठेव खात्यातून कर्ज खात्याकडे रक्कम वर्ग करू शकते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ४६ प्रमाणे सहकारी संस्थेस सभासदाच्या भाग रकमेवर, ठेवीवर, लाभांशावर व अन्य जमा रकमेवर बँकेचा सामान्य धारणाधिकार असतो व अशा सभासदाच्या केवळ थकित कर्जाच्या परतफेडीसाठी अशी संस्था (बँक) सदर रक्कम वर्ग करू शकते. संस्थेच्या या अधिकारास भार व वजावट अधिकार असे म्हणतात. मात्र विशिष्ट कारणाकरिता त्यांनी आपल्या ठेव खात्यात पैसे भरले असल्यास (उदा:- पैसे इतरत्र पाठवणे) किंवा त्याने विश्वस्त या नात्याने बँकेत ठेवलेली रक्कम किंवा सेफ डिपॉझिट लॉकरमध्ये ठेवलेल्या वस्तूवर बँकेत असा धारणाधिकार असत नाही, पतसंस्था/ बँकांनी कर्ज देताना भार व वजावटीचा दस्त करणे त्यांचेसाठी हितावह असते.

**३. विशेष धारणाधिकार** (Special Lien) - याचे उदाहरण म्हणजे बँकेने खातेदारास ठेवीवर दिलेला अ‍ॅडव्हांस (OD on FD) हे होय. यामध्ये बँकेचा धारणाधिकार हा ठेवीदाराच्या विशिष्ट अशा ठेवीवर असतो.

वरील दोन्ही धारणाधिकार हे एक प्रकारे बँकेच्या अद्याहात अधिकार (Implied Right) असल्याने अशा अधिकाराची (बोजाची) कोठेही नोंदणी करावी लागत नाही.

**४. मालकी हक्क हस्तांतरण** (Assignment):- मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२ चे कलम १३० अन्वये कारवाई योग्य दाव्यांचे (Actionable Claims) हस्तांतरण केल्यास हस्तांतरण कर्त्याचे अधिकार ज्याला ते हस्तांतरण (Assign) केले आहे, त्यास प्राप्त होतात. उदा:- कर्जदाराने त्याचे कारवाई योग्य दावे बँकेस हस्तांतरित केल्यास ते वसुलीचे अधिकार बँकेस प्राप्त होतात. कर्जदाराने बँकेस त्याची आयुर्विमा पॉलिसी असाइन केल्यास म्हणजेच विमा कंपनीकडे त्या पॉलिसीवर बँकेचा बोजा नोंदवल्यास बँकेस त्या पॉलिसीतील हितसंबंध (Right) प्राप्त होतात.

त्याचप्रमाणे कर्जदारास त्याच्या व्यवसायातून निर्माण झालेली येणे कर्ज (Book Debts), कंत्राटदाराची सप्लाई बिले इ. बँकेस असाइन करून दिल्यास योग्य वेळी अशा रकमा मिळण्याचा बँकेस अधिकार प्राप्त होतो. थोडक्यात मालकी हक्काचे रीतसर हस्तांतरण (Assignment) केल्यास बँकेचे हक्क प्राप्त होतात.

**५. ताबेगहाण** (Pledge):- ताबेगहाणची व्याख्या भारतीय करार कायद्यातील कलम १७२ मध्ये दिलेली आहे.

The bailment of goods as security for payment debt is called pledge.

ज्यावेळी कर्जदार त्याला घ्यावयाच्या कर्जासाठी त्याच्या मालकीच्या वस्तू बँकेत प्रत्यक्षात तारण म्हणून सुपूर्द करतो त्यास वस्तूचे कायदेशीर हस्तांतरण किंवा ताबेगहाण कर्ज असे म्हणतात.

उदा. ❊ कर्जदार त्याच्याकडील सोने प्रत्यक्षात बँकेकडे गहाण ठेवतो व कर्ज मिळवतो.

❊ ज्यावेळी कर्जदार कर्जापोटी त्याच्याकडील माल बँकेस गहाण देतो म्हणजेच त्याच्या गोडाऊनची चावी बँकेकडे देतो, त्यावेळी अशा मालावर बँकेचा प्रत्यक्ष ताबा असतो व कर्जदार बँकेच्या पूर्वपरवानगीने वेळोवेळी कर्ज रकमांची परतफेड करून त्या प्रमाणात गोदामातून विक्रीसाठी माल बाहेर काढत असतो. बँक कर्ज परतफेड रक्कम व तारणीमाल यांच्यात योग्य तो दुरावा राखून असा माल गोदामातून बाहेर जाऊ देत असते. राज्य सरकारी

पुढील पानावर...

मागील पानावरून...

## सुरक्षित / असुरक्षित कर्जे - सुरक्षिततेला प्राधान्य हवे

बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक, साखर कारखान्यांना या प्रकारचे कर्ज देत असतात. ताबेगहाण हा प्रकार केवळ चल मालमत्तेच्या बाबतीत असतो, अचल मालमत्तेच्या नव्हे.

* रेल्वे रिसीट हादेखील ताबेगहाण कर्जाचा प्रकार आहे. जरी रेल्वे रिसीट हस्तांतरणांवेळी असा माल बँकेच्या प्रत्यक्षात ताब्यात नसला तरी अशा पावतीच्या आधारे बँकेस संबंधित मालावर हक्क प्राप्त होत असतो.

**६. नजरगहाण** (Hypothecation):-

'नजरगहाण'ची व्याख्या सरफेसी कायदा २००२ कलम २ (एन) मध्ये दिलेले असून ती पुढीलप्रमाणे :-

Hypothecation means a charge upon any movable property existing or future created by a borrower in favour of a secured creditor without delivery of possession of the movable property to such creditor as a security for a financial assistance includes floating charge crystalisation of such charge into fixed charge on movable property.

वरील व्याख्येवरून नजरगहाण कर्जात कर्जदार हा बँकेने दिलेल्या कर्जापोटी बँकेस त्याच्या चल मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा न देता अशा मालावर बोजा निर्माण करतो. नजरगहाण कर्ज हा व्यवसायिकांना दिलेल्या कर्जाचा एक प्रकार असून बँका मुख्यतः व्यावसायिकांच्या खेळत्या भांडवलाची (working capital) गरज भागविण्याकरिता कॅश क्रेडिट कर्ज देतात. यामध्ये कर्जदारास त्याच्या व्यवसायाचा खेळत्या भांडवलाची गरज ही त्याने वेळोवेळी सादर केलेल्या साठापत्रकावरून (Stock Statements), त्याला येणे असलेल्या sundry debtors कडूनच्या रकमा त्याला देय असलेल्या sundry creditors च्या रकमा त्यांच्या मालाच्या विक्रीचे फेरे (Sales Turn over) लक्षात घेऊन कर्जाची नेमकी गरज पडताळून अशा रकमा दिल्या जातात. कर्जदारांच्या मालावरील बँकेचा बोजा हा तरता बोजा (Floating charge) या प्रकारचा असतो. कर्जदार थकित झाल्यास सदरचा माल अडकवून ठेवण्याचा बँकेस अधिकार असतो.

बँक देत असलेली वाहन कर्जे, मशिनरी कर्ज हा देखील नजरगहाण कर्जाचाच प्रकार होय. यात मालाची वस्तूची मालकी व ताबा कर्जदाराकडे असतो. मात्र अशा मालावर वस्तूवर बँकेचा बोजा असतो. वाहन तारण कर्जात तो आरटीओ कार्यालयाकडे नोंदलेला असतो व वाहनाची एक चावी बँकेच्या ताब्यात असते. अशा कर्जात फॅक्टरी / गोडाऊन यावर बँकेचा बोजा असलेला फलक असतो.

**७. गहाणखत** (Mortgage) :- गहाणखत हे अचल संपत्तीबाबत निष्पादित केले जाते. याची व्याख्या मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२ च्या कलम ५८ मध्ये दिलेली असून ती खालील प्रमाणे.

Transfer of interest in the specified immovable property belonging to debtor in favour of creditor.

वरील व्याख्येप्रमाणे कर्जदाराच्या अचल मालमत्तेतील हितसंबंधाचे बँकेकडे हस्तांतरण म्हणजे गहाणखत होय. गहाणखताचे विविध प्रकार आहेत. मात्र बँका या साधे गहाणखत / नोंदणीकृत गहाणखतास प्राधान्य देतात. त्यामुळे या लेखात केवळ त्याचीच चर्चा केली आहे.

**८. साधे गहाणखत/नोंदणीकृत गहाणखत** (Simple/Registered Mortgage):-

स्थावर मालमत्ता ज्या क्षेत्रात आहे, त्या क्षेत्राच्या दुय्यम निबंधक कार्यालयाकडे बँक व कर्जदार यांनी निष्पादित केलेल्या गहाणखताची नोंदणी आवश्यक ती स्टॅम्प ड्यूटी भरून केली जाते. या प्रकारात मालमत्तेचा ताबा हा कर्जदाराकडे राहतो. मात्र मालमत्तेतील हितसंबंध (Right) बँकेकडे वर्ग होतो. तसेच या प्रकारात बँकेस कायदेशीर संरक्षण प्राप्त होते. अशा नोंदणीकृत गहाणखताच्या आधारे मालमत्तेच्या उताऱ्यावर मालमत्ता पत्रकावर बँकेचा बोजा नोंद होतो. कर्जदाराने कर्ज थकविल्यास बँक न्यायालयाच्या न्यायाधिकरणाच्या निवाड्यांच्या आधारे अशी मालमत्ता विकून कर्ज रक्कम वसूल करून घेते.

ज्यावेळी बँक सरफेसी कायद्याअंतर्गत कारवाई करते, त्यावेळी तिला कोणत्याही न्यायालयाच्या हस्तक्षेपाशिवाय (Without intervention of any court) त्या कायद्यातील प्रक्रिया पूर्ण करून अशी मालमत्ता विकून कर्ज वसुली करता येते. मात्र पतसंस्थांना सरफेसी कायदा लागू नसल्याने त्यांना न्यायालय/ न्यायाधिकरणाचा निवाडा प्राप्त करूनच त्याची विक्री करता येते.

* **समारोप :** बँका व पतसंस्था यांनी आपला कर्ज देण्याचा व्यवसाय करीत असताना सुरक्षित कर्जालाच प्राधान्य द्यावे. सुरक्षित तारणी कर्ज म्हणजे वेगवेगळ्या कायद्यांमध्ये अशा चल-अचल संपत्तीबाबतचे कायदे त्यातील बारकावे लक्षात घेणे गरजेचे असते. वित्तीय संस्थांनी विविध कायद्यातील असे बारकावे लक्षात घेऊनच कर्ज व्यवहार केल्यास त्यांची कर्जे सुरक्षित राहून प्रसंगी त्यांची विल्हेवाट लावतात. योग्य त्या कायदेशीर मार्गाचा अवलंब करून आपला कर्जरूपी वाटलेला निधी सुरक्षित परत मिळवणे आवश्यक असते.

**- संतोष मानूरकर**
**विशेष लेखापरीक्षक वर्ग २ सोलापूर**
**मो.नं.- ९८५०७ ८३९८३** *****

## सहकारी पतसंस्थांचे राज्यस्तरीय कार्यालय अधिक गतिमान करणार- पतंगे



**दिलीप पतंगे**

**सोलापूर -** राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या दैनंदिन कामकाजात अत्याधुनिक तंत्रज्ञान आणण्याबरोबर संस्थांच्या सक्षमीकरणावर अधिकाधिक भर दिला जाणार आहे. तसेच राज्यस्तरीय कार्यालय अधिक गतिमान होण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत, असे सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन संस्थापक दिलीप पतंगे यांनी सांगितले.

अडचणीमध्ये आलेल्या पतसंस्थाना फेडरेशनचा आधार असतो असे नमूद करून ते म्हणाले, पतसंस्थांच्या समोर असणाऱ्या अनेकविध प्रश्नांची सोडवणूक करण्याबरोबर त्यांच्यामध्ये सकारात्मक बदल घडविण्यासाठी ८ तज्ञ सदस्यांची समिती तयार करण्यात आली आहे. फेडरेशनचे स्वतंत्र लेखा परीक्षकांचे पॅनल, कर्मचारी भरतीसाठी स्वतंत्र यंत्रणा आणि प्रशिक्षणाची सुविधा, विविध उपक्रम राबविणे, अडचणीतील पतसंस्थाना सुस्थितीत आणणे, सहकार क्षेत्रावरील सर्वसामान्य जनतेचा विश्वास वाढावा यासाठी संस्कारित कार्यकर्त्यांची फळी निर्माण करणे आणि सहकारी संस्थामध्ये विश्वास सहकार्य वाढविणे अशा विविध उपक्रमांवर भर दिला जाणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील पतसंस्थांना ज्या अडचणी आहेत. त्याच कमी अधिक प्रमाणात राज्यातील अनेक पतसंस्थांसमोर आहेत असे नमूद करून ते म्हणाले, याबाबत जिल्हा फेडरेशनच्या वतीने काही सकारात्मक उपाययोजना करण्यात आल्या. त्याचा चांगला परिणाम दिसून आला. त्यामुळे जिल्ह्याचे हे मॉडेल राज्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

# केंद्रीय सहकार मंत्रालय आणि नागरी सहकारी बँका

केंद्र सरकारच्या पातळीवर यापूर्वी स्वतंत्र असे सहकार मंत्रालय नसल्याने केंद्र सरकारचे पातळीवरून नागरी बँकांचे बाबतीत अधिक सुविधा देणे बाबतीत फारसे प्रयत्न केले जात नव्हते. दिनांक ६ जुलै २०२१ पासून केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये स्वतंत्र सहकार खात्याची निर्मिती झाल्यानंतर या बाबीला अधिक चालना मिळाली असून, प्राथमिक कृषी सहकारी संस्था बरोबरच अन्यही सहकारी संस्थांच्या व्यावसायिक वृद्धीच्या दृष्टीने अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. बहुराज्यीय नागरी सहकारी पतसंस्थांचे बाबतीतदेखील अधिक नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने ऑगस्ट २०२३ मध्ये बहुराज्यीय सहकार कायद्यात अमुलाग्र बदल करण्यात आले आहेत.



गणेश निमकर
९८२२५ ६८५५०

नागरी बँकांचे बाबतीत जून २०२० नंतर रिझर्व्ह बँकेने नियंत्रण देखील कडक केले असून, नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत व्यवसाय सुरक्षा व वृद्धीसाठी सर्व प्रकारचे निर्णय घेण्याचे अधिकार हे रिझर्व्ह बँकेला असल्याने केंद्र सरकारला या संदर्भात असे कोणतेही अधिकार नसले तरी केंद्रीय सहकार मंत्रालय स्थापनेनंतर केंद्रीय सहकार मंत्रालयाकडून रिझर्व बँकेला काही निर्णय घेण्याबाबत सूचित करण्यात आले. या संदर्भात रिझर्व बँक ऑफ इंडियाने देखील काही महत्त्वाचे निर्णय घेतले. हे निश्चितच केंद्रीय सहकार मंत्रालयाचे पर्यायाने केंद्र सरकारचे यश आहे हे मान्य करावे लागेल. या निर्णयांपैकी काही निवडक निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

**१) डोअर स्टेप बँकिंग म्हणजेच घरपोच बँकिंग सेवा :–**

बँकिंग हा ग्राहकाभिमुख सेवा व्यवसाय आहे. अशा परिस्थितीमध्ये नागरी सहकारी बँकेच्या ग्राहकाला सर्वच सेवांसाठी बँकेमध्ये यावे लागत असे. मात्र या उलट अन्य बँका काही सेवा घरपोच देत असत. ही सुविधा नागरी सहकारी बँकांनादेखील उपलब्ध व्हावी, म्हणून रिझर्व बँकेकडे केंद्रीय सहकार मंत्रालयाकडून विनंती करण्यात आली. कोणत्याही नागरी सहकारी बँकेला नवीन ठिकाणी त्यांच्या सेवा देण्यासाठी किंवा व्यवसाय सुरू करण्यासाठी रिझर्व बँकेच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता असते.

या अनुषंगाने रिझर्व बँक ऑफ इंडियाने बँकिंग नियमन कायदा १९४९ मधील कलम २३ च्या अधीन राहून दिनांक ८ जून २०२२ रोजी परिपत्रकाने परवानगी दिली आहे. रिझर्व बँकेने ही परवानगी देत असताना ज्या बँका आर्थिकदृष्ट्या सक्षम असून उत्तम रीतीने व्यवस्थापन करत आहेत. (ज्यांना एफ. एस. डब्ल्यू. एम. असे म्हटले जाते.) अशा बँकांना काही निकष पूर्तता करण्याच्या अटीवर रिझर्व बँकेच्या कोणत्याही पूर्वपरवानगीशिवाय घरपोच अथवा डोअर स्टेप ग्राहक सेवा देता येणार आहे असून, ज्या बँका एफ.एस.डब्ल्यू.एम.च्या निकषांमध्ये बसत नाहीत त्यांना रिझर्व बँकेच्या पूर्वपरवानगीने ही सुविधा देता येईल. या परिपत्रकामध्ये बँकेला कोणत्या सेवा घरपोच येतील या निर्धारित केल्या असून त्या सेवा देण्याबाबत कोणती कार्यपद्धती असावी तसेच त्यामध्ये असणाऱ्या जोखमीचे व्यवस्थापन कसे करावे आणि यामध्ये या सेवा अदा करत असताना कशाप्रकारे पारदर्शकता असावी याची मार्गदर्शक तत्त्वे रिझर्व बँकेने आखून दिलेली आहेत. या सुविधेमुळे निश्चितच नागरी सहकारी बँकांच्या ग्राहक वृद्धीसाठी पर्यायाने व्यवसाय वाढीसाठी खूप मोठा फायदा होणार आहे. यामध्ये विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व महिला या ग्राहकांसाठी अशा सेवा देता आल्याने हा ग्राहक बँका नागरी बँकांकडे आकर्षित होणार आहेत. ही सेवा देण्याबाबतीत केंद्रीय सहकार मंत्रालयाने रिझर्व्ह बँकेकडे पाठपुरावा केला होता.

२) **सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी क्रेडिट गॅरंटी फंड योजना (उत्र्छचडए) :–** सर्वच बँकांप्रमाणे ठेवीसाठी सध्या रुपये पाच लाखांपर्यंत ठेव विमा संरक्षण दिलेले आहे. मात्र नॉन शेड्यूल्ड किंवा राज्य व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या कर्जासाठी कोणत्याही प्रकारची विमा सुरक्षा अस्तित्वात नव्हती. यापूर्वी विमा आणि क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन (ऊखउत्र्छ) यांचे मार्फत ही सुविधा दिली जात होती.

भारत सरकार आणि सिडबी यांच्या सहकार्याने सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्टची स्थापना झालेली असून दिनांक ०१ ऑगस्ट २००० पासून सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी क्रेडिट गॅरंटी फंड योजना कार्यान्वित आहे. या योजनेमध्ये पूर्वी फक्त शेड्यूल्ड नागरी सहकारी बँका यांचा अंतर्भाव होता.

केंद्र सरकारने दिनांक ३ फेब्रुवारी २०२२ च्या परिपत्रकानुसार काही निकषपूर्तींच्या आधारावर नॉन शेड्यूल्ड नागरी सहकारी बँक तसेच राज्य सहकारी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांनादेखील या योजनेमध्ये समाविष्ट केलेले आहे.

यापूर्वी नॉन शेड्यूल्ड नागरी बँका किंवा राज्य व जिल्हा मध्यवर्ती बँकांकडून सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना कर्ज देत असताना संबधित नवउद्योजकांकडून पूरक तारण घेतल्याशिवाय कर्ज देता येत नव्हते. या सुविधेमुळे आता अशा क्षेत्राला कर्जपुरवठा देणे सुलभ होऊन अधिकाधिक नवीन उद्योजक तयार होण्यास मदत होईल. ही योजना नॉन शेड्यूल्ड नागरी बँका किंवा राज्य व जिल्हा मध्यवर्ती बँकांना निश्चितच व्यवसाय वृद्धीसाठी पूरक ठरणार आहे.

**३) आधार एनेबल सर्व्हिस :–** ही एक पेमेंट सुविधा आहे. यामध्ये ग्राहकाला आधार कार्डाच्या सहाय्याने त्याच्या संबंधित बँक खात्यामधून व्यवहार करता येतात. यामध्ये अत्यंत सर्वसामान्य ग्राहक अगदी कमी रकमांचे व्यवहार करत असल्याने त्याचे सेवा दरामध्ये कपात करून अधिकाधिक ग्राहक या पेमेंट सेवा सुविधेमध्ये समाविष्ट होण्यासाठी केंद्रीय सरकारने प्रयत्न केले आहेत.

**४) अम्ब्रेला ऑर्गनायझेशन :–** नागरी सहकारी बँकांच्या ठेवीसाठी रुपये पाच लाखांपर्यंत ठेव विमा संरक्षण आहे. मात्र ही विमा रक्कम कोणतीही बँक सर्वसमावेशक पर्यवेक्षीय बंधने लागू झाल्यानंतर किंवा अवसायनात गेल्यानंतर ठेवीदाराला मिळते. अनेक वेळेला बँकेला काही कारणाने तरलतेची अडचण निर्माण होऊ शकते व त्या तरलतेसाठी योग्य वेळेत वित्तपुरवठा मिळाला नाही तर ती बँक अडचणीत येते.

तरलतेअभावी एखादी नागरी सहकारी बँक अडचणीत येऊ नये यासाठी एखादी यंत्रणा असावी, या दृष्टीने केंद्र सरकारने रिझर्व बँक ऑफ इंडिया कडे नागरी सहकारी बँकांसाठी अम्ब्रेला ऑर्गनायझेशन असावी असे सुचित केले होते. याबाबत राष्ट्रीय स्तरावरील नागरी बँकांचे फेडरेशन व केंद्र सरकार यांच्या संयुक्त प्रयत्नामुळे रिझर्व बँकेने जून २०१९ मध्ये अम्ब्रेला ऑर्गनायझेशनसाठी मान्यता दिली. आज ह-ी अम्ब्रेला ऑर्गनायझेशन अस्तित्वात आली असून त्या ऑर्गनायझेशनमध्ये गुंतवणूक करण्यासाठी देखील नागरी सहकारी बँकांना रिझर्व बँकेने परवानगी दिलेली आहे. नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत वैधानिक तरलतेच्या गुंतवणुकीसाठी केंद्रीय अथवा राज्य सरकारच्या

पुढील पानावर...



# इचलकरंजी को-ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट संस्थेची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध

**इचलकरंजी –** इचलकरंजी को-ऑप. इंडस्ट्रियल इस्टेट या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली. नूतन संचालक मंडळात अध्यक्ष म्हणून राहुल प्रकाश खंजिरे, उपाध्यक्ष महादेव शंकर कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. गेली ६६ वर्षे ही संस्था कार्यरत आहे.

तसेच राजेंद्र महादेव बिद्रे, सुनिल सातगोंडा पाटील, निलेश बापुलाल चंगेडीया, सागर विजय कोईक, उदय शंकर आदर्शे, विजयकुमार रामस्वरुप पारीक, प्रकाश राजाराम नवनाळे, आनंद गिरीधारीलाल मालू, किरण हिंदुराव कांबळे, सुहेल दस्तगीर बाणदार, उमा रविंद्र मुरदंडे व हसिना रियाज गैबान व आदाप्पा भरमू हांडे यांचा समावेश आहे. नूतन संचालकांची बैठक झाली. संस्थेच्या प्रगतीचा आलेख भविष्यातदेखील कायम ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीन, अशी प्रतिक्रिया नूतन अध्यक्ष खंजिरे यांनी व्यक्त केली. निवडणूक निर्णय अधिकारी डी. आर. पोवार यांचे सहकार्य केले.

## डिफेन्स अकौंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेचा स्नेह मेळावा संपन्न

**पुणे –** येथील डिफेन्स अकौंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या भाग भांडवलात लक्षणीय वाढ झाली असून एकूण भाग भांडवल ५२८.१४ लाख झाले आहे. त्याचप्रमाणे बँकेच्या ठेवीत २२.६५ लाख वाढ झाली असून एकूण ठेवी ७१६.५५ लाख झाल्या आहेत. बँकेचा स्नेह मेळावा नुकताच पार पडला. सहकार भारतीचे संस्थापक सदस्य आणि आरबीआय संचालक सतीश मराठे, सहकारी संस्था आणि नागरी बँक विभागाचे उपनिबंधक आनंद कटके, सहायक निबंधक सतीश ढमाळ, सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन अध्यक्ष सुभाष मोहिते तसेच बँक अध्यक्ष दिगंबर सांडभोर, उपाध्यक्ष तात्या ढमाळ, रामराव लेंभे, नितिन वाणी, मुख्य कार्यकारी अधिकारी विद्या पाटील, संचालक अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मूळ संस्थापक स्व. कृष्णाजी सदाशिव गोरे सुरूवातीला सोसायटी म्हणून कार्यरत असणारी संस्था ९ मार्च १९८५ ला बँकेत रूपांतरित झाली.

## रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स संस्थेचा ५०० कोटी ठेवीचा टप्पा पार

**कोल्हापूर, गडहिंग्लज –** येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स संस्थेने नुकताच ५०० कोटींचा ठेवीचा टप्पा पार केला आहे. यामुळे नजीकच्या काळात संस्थेचे बँकेत रूपांतर करण्याचा मानस संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी व्यक्त केला आहे.

ते म्हणाले, पारदर्शक व्यवहार, तत्पर सेवा सदस्य आणि ग्राहकांनी दाखवलेला विश्वास यामुळे संस्थेने अल्पावधीत मोठी प्रगती केली आहे. परिणामी संस्थेतील गुंतवणूक वाढण्यास हातभार लागला आहे. संस्थेच्या सध्या १५ शाखा कोल्हापूर, बेळगाव, सांगली, सातारा आणि पुणे जिल्ह्यात कार्यरत आहेत. अनेकविध योजना आणि उत्तम ग्राहक सेवा संस्थेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येतात. त्यामुळे संस्थेने उद्दिष्ट पूर्ण करण्यात यश मिळविले आहे.

## राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था सदस्यपदी जिजाबा पवार

**पुणे –** राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळाच्या सदस्यपदी ज्ञानदीप को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष आणि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक जिजाबा पवार यांची निवड सहकार विभागाकडून करण्यात आली आहे. या निवडीबद्दल बँकेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. ज्ञानदीप संस्थेच्या राज्याच्या विविध भागात ११० शाखा, ८ विभागीय कार्यालये, ५ प्रशिक्षण केंद्र आणि ६५०० कोटीचा संमिश्र व्यवसाय आहे. तसेच ३ लाख सभासद आणि २३०० कर्मचारी कार्यरत आहेत.

## राजर्षि शाहू सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी उद्योगपती शांताराम अण्णा धनकवडे

**पुणे –** राजर्षि शाहू सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी उद्योगपती शांताराम अण्णा धनकवडे यांची निवड झाल्याबद्दल धनकवडी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. बँकेची स्थापना १९८४ मध्ये झाली. बँकेच्या आजवरच्या वाटचालीत धनकवडे यांनी संचालक आणि उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे भारतीय जनता पक्षाचे आमदार भीमराव तापकीर तसेच ज्येष्ठ नेते बापूसाहेब धनकवडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## राजारामबापू सहकारी बँकेला ५० कोटी रुपयांचा नफा

**सांगली –** येथील राजारामबापू सहकारी बँकेला नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ५० कोटी रूपयांचा नफा झाला आहे, अशी माहिती बँक अध्यक्ष प्रा. शामराव पाटील यांनी सांगितली. उपाध्यक्ष विजय यादव आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

बँकेकडे २५४९ कोटी १३ लाख ठेवी आणि १७०४ कोटीचे कर्ज पुरवठा करण्यात आला आहे. एकूण व्यवसाय ४२५३ कोटी असून निव्वळ एनपीए शून्य टक्के राखण्यात यश मिळाले आहे. सेवकांना २५ टक्के सानुग्रह अनुदान देण्यासाठी तरतूद केली आहे तर सदस्यांना १२ टक्के लाभांश देण्याचा संचालकांचा मानस आहे, अशी माहिती सांगण्यात आली.

मागील पानावरून...

## केंद्रीय सहकार मंत्रालय आणि नागरी बँका

कर्जरोख्यांमध्येच गुंतवणूक करणे बंधनकारक असून त्या व्यतिरिक्त अन्य गुंतवणुका या नॉन एस. एल. आर. स्वरूपाच्या किंवा गैरवैधानिक तरलता गुंतवणूक म्हणून वर्गीकृत केल्या जातात. अशा प्रकारच्या गैर वैधानिक तरलता गुंतवणूक करण्यासाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाने मर्यादा निर्धारित केलेली आहे. अम्ब्रेला ऑर्गनायझेशनमध्ये केलेली गुंतवणूक ही देखील गैरवैधानिक तरलता गुंतवणूक असल्याने या गुंतवणूकीवर बँकांना निर्धारित मर्यादा असल्याने यामध्ये पुरेसा निधी उपलब्ध होणार नाही ही बाब लक्षात घेऊन याबाबतीत केंद्रीय पातळीवरून रिझर्व्ह बँकेकडे या निर्धारित मर्यादेमध्ये सवलत देण्याबाबतीत सूचित केले होते. रिझर्व्ह बँकेने दिनांक ३ मार्च २०२२ रोजी अशा गुंतवणुकांना गैरवैधानिक तरलता गुंतवणुकीच्या निर्धारित मर्यादेमधून सवलतदेखील दिलेली असल्याने यामध्ये पुरेसा निधी उपलब्ध होण्यास मार्ग मोकळा झाला आहे.

वरील सर्व बाबींचा विचार केला असता केंद्रीय सहकार मंत्रालय पातळीवरून सहकारी बँका विशेषतः नागरी सहकारी बँकांच्या सक्षमीकरण व व्यवसाय वृद्धीसाठी अनेक प्रयत्न होत असल्याचे दिसून येत आहे. ही नागरी सहकारी बँकांच्या दृष्टीने निश्चितच स्वागतार्ह गोष्ट आहे. नागरी सहकारी बँकांनी या सर्व गोष्टींचा आपले व्यवसाय सुरक्षा व वृद्धीसाठी अधिकाधिक उपयोग करून घेणे मात्र आवश्यक आहे.

**– गणेश रा. निमकर, पुणे.** *****

# ट्रस्ट कायद्यातील विश्वस्तांसाठीच्या महत्वपूर्ण तरतुदी



अशोक कुरापाटी

विधायक कार्याची दृष्टी घेऊन समर्पित भावनेने समाजपरिवर्तन व कल्याणांसाठी स्वतःची पदरमोड सहन करणाऱ्या पथदर्शी विश्वस्त संस्थांमधील विश्वस्तांना कायदेविषयक पुरेशी जागृती नसल्याने अनेक वेळा अडचणी ना सामोरे जावे लागते. प्रसंगी दंडात्मक कारवाई, संस्था नोंदणी रद्द होण्याची नामुष्की, परिणामतः समाज कार्यापासून निवृत्ती घेणेची निर्माण होणारी मानसिकता, अलिप्ततादेखील ओढवली जाते. वादविरहित, विश्वस्त संस्थेत प्रेम, संस्था निष्ठता, आपुलकी विश्वस्तांमध्ये निर्माण होण्यासाठी कायदेविषयक जनजागृती होण्यासाठी महाराष्ट्र विश्वस्त कायदा अधिनियम व नियमात विश्वस्तांविषयी निगडित काही महत्त्वपूर्ण कलमांचा आढावा घेऊ.

**१. कलम २२ – चेंज रिपोर्ट – बदल अर्ज :–**

कोणत्याही संस्थेच्या नावात, पत्त्यात, विश्वस्तात, मालमत्ता ग्रहण, मालमत्ता विक्री, खरेदी विल्हेवाट, मालमत्ता स्वरूपात बदल, मंजूर घटनेत बदल इत्यादी संदर्भात हे कलम महत्वाचे आहे. कायद्यातील तरतुदीनुसार ९० दिवसाचे आत वरील बाबींसंदर्भात निर्णय झाल्यानंतर सार्वजनिक धर्मादाय आयुक्त कार्यालयास विहित नमुन्यात परिशिष्ट ३ मध्ये प्रतिज्ञापत्रकासह सादर करण्याची विश्वस्तांची जबाबदारी आहे.

विश्वस्त मंडळाने ठरावांन्वये एकाविश्वस्तास अधिकार प्रदान करून केलेल्या Reporting trustee मार्फत करता येते विश्वस्त मंडळाच्या नव्याने निवडणुका झाल्यास राजीनामा, मृत्यू, असमर्थ ठरल्याने रिक्त झालेल्या पदी, नव्या विश्वस्तांचे, संमतीपत्रकासह, राजीनामा पत्राची मूळ प्रत, मृत्यू दाखल्याची प्रमाणित नक्कल, सभेची नोटीस, इतिवृत्त इ. कागदपत्रासह दाखल करण्याचे बंधन आहे. विहित मुदतीत हा चेंज रिपोर्ट सादर न केल्यास कलम ६६ व नियम १३ चे तरतुदीनुसार रु ० ते १०,००० पर्यंत विश्वस्तांना दंड होऊ शकतो. या दंडाची रक्कम ट्रस्टच्या फंडातून न करता विश्वतांना वैयक्तिकरीत्या या दंडाची रक्कम सोसावी लागते, मुदतीनंतर विलंब अर्ज समर्पक पुरेशा योग्य कारणास्तव दाखल करता येतो. मात्र कलम ६६ प्रमाणे दंडाची रक्कम ठरविण्याचा अधिकार धर्मादाय आयुक्तालयास असतो. बदल अर्जास रु २००/– च्या कोर्ट स्टॅम्प लावावा लागतो. हा बदल अर्ज ऑनलाईन सादर करता येत नाही. अर्ज दाखल झाल्यानंतर त्यास चौकशी अर्ज क्रमांक मिळतो.

वादविरहित प्रस्तावास १५ दिवसात तात्पुरती मंजुरी जाहीर नोटीस प्रसिद्ध होऊन ३० दिवसाचे आत कोणतेही हरकत / आक्षेप / तक्रार प्राप्त न झाल्यास सत्यता पडताळून कारण मीमांसासह कलम २२ (३) चे तरतुदीप्रमाणे बदल अर्ज मंजुर / निकाली काढण्यात येते. हरकती प्राप्त झाल्यास संबंधितांना बाजू मांडण्याची संधी देऊन दिवाणी न्यायालयाप्रमाणे चौकशी प्रक्रिया कार्यरत होते. बदल अर्जाविषयी दिलेला निर्णय मान्य नसल्यास वरिष्ठांकडे दाद मागता येते. विश्वस्त म्हणून काम करण्याची लेखी संमती सादर केल्यानंतर न्यासाच्या प्रक्रियेतील सर्व घटकांची जबाबदारी वाढते.

**२. विविध कलमांतर्गत कोर्ट स्टॅम्प फी :–**

महाराष्ट्र शासनाचे राजपत्र क्र.६३ दिनांक ३१/०७/२०२४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे धर्मादाय आयुक्तालयाकडे विविध कलमांतर्गत सादर करावयाचा अर्जांना लावावयाच्या कोर्ट स्टॅम्पची आता माहिती घेऊ या.

| कलम | अर्जाचे/स्वरूप | कोर्ट स्टॅम्प फी |
|---|---|---|
| १८ | संस्था नोंदणी अर्ज | रु.२००/– |
| २२ | बदल अर्ज/चेंज रिपोर्ट | रु.२००/– |
| २५ | एकापेक्षा अधिक अधिकाऱ्याकडे दावा असल्यास त्या संबंधीचा अर्ज | रु.२००/– |
| ४१ अ | न्यासाच्या योग्य प्रशासनासाठी निर्देश देण्याचा अधिकार | रु.१००/– |
| ४१ ब | न्यासा विरुद्ध तक्रार | रु.१००/– |
| ५० अ १(२) | नवीन योजना किंवा योजनेत बदल | रु.१००/– |
| ५१ | न्यासाविरुद्ध वैयक्तिकरीत्या सिव्हील कोर्टात दावा दाखल करण्यास परवानगीचा अर्ज | रु.१००/– |

**सहाय्यक आयुक्त यांचे अधिकार क्षेत्रातील**

| | | |
|---|---|---|
| ३५ | न्यासाची जंगम मालमत्ता/रोख रुपये ५०० पर्यंत | रु.५०/– |
| | 'रकमेची शेअर्स डिबेंचर्समध्ये गुंतवणूक / मालमत्ता खरेदी ही रकमेनुसार असते.<br>रुपये ५०१ ते ५०००/–<br>रुपये ५००१/– ते २५०००/–<br>रुपये २५००१/– चे पुढे | <br><br><br>रु.१००/–<br>रु.१५०/–<br>रु.२५०/– |
| ३६ (अ) १ | मालमत्ता विक्री अदलाबदल बक्षीसपत्र | मालमत्तेच्या किंमतीनुसार किमान रुपये ५०/– ते कमाल रुपये ३०००/– पर्यंत |
| ३६ (१) (ब) | लीज भाडे कराराने ट्रस्टची मालमत्ता देण्यासाठी परवानगी | भाड्याच्या रकमेनुसार रुपये २५/– ते ५०० पर्यंत आहे. ३ वर्षांपर्यंत भाडे करारास परवानगीची अट नाही. |
| ३६ (अ) ३ | विश्वस्त संस्थेस कर्ज काढण्यास परवानगी अर्ज | कर्जाच्या रकमेनुसार रुपये २५ ते ५००/– |
| ४१ ब | विश्वस्तास काढणे, बडतर्फ करणे, विश्वस्तांकडून न्यासाची फसवणूक दुर्लक्ष विरुद्ध दाद | रुपये १००/– |
| ४१ (ई) | तात्पुरता अर्ज | रुपये १००/– |
| ४७ | बदल अर्ज दाखल नाही, ट्रस्टची नियुक्ती नाही, ट्रस्टीजच्या नियुक्तीसाठी | रुपये १००/– |
| ७० (अ) | अपील अर्ज | रुपये १००– |
| ७३ (अ) | चौकशीत सामील होण्यासाठी | रुपये १०/– |
| नियम २३ | प्रमाणित प्रती मिळणेसाठी | रुपये ५/– |
| | म्हणणे सादर करण्यासाठी | रुपये १०/– |

पुढील पानावर...

मागील पानावरून...

## ट्रस्ट कायद्यातील विश्वस्तांसाठीच्या महत्वपूर्ण तरतुदी

**३. न्यासाची हिशोबपत्रके सादर करण्याची जबाबदारी :–**

विश्वस्त कायदा कलम ३३ व ३४ चे तरतुदीनुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांचे आत प्रत्येक विश्वस्त संस्थेला त्यांचे नोंदीत धर्मादाय आयुक्तालयाचे कार्यालयास सनदी लेखापाल / प्रमाणित लेखापरीक्षकांनी तपासून प्रमाणित केलेले विहित नमुन्यातील हिशोबपत्रके किमान तीन विश्वस्तांच्या स्वाक्षरीने सादर करणे बंधनकारक आहे. रु.१०,०००/– पेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या न्यासास आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी एक महिन्याचे कालावधीत अंदाजपत्रके सादर करणे आवश्यक आहे ही हिशोबपत्रके ऑनलाईन सादर करण्याची सुविधा आहे मात्र हार्ड कॉपी सादर करून पोहोच स्वाक्षरी प्रत न्यासाचे दप्तरी असणे उत्तमच, या संबंधीचा तपशील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**४. विश्वस्तांमधील समन्वय :–** कलम ४१ मध्ये या संबधीच्या तरतुदी संवेदनशील आहेत. विश्वस्तांमध्ये अ समन्वय, आपआपसातील अविश्वास, एकमेकांतील हेवेदावे या मुळे वादविवादाचे केसेस तयार होतात. काही ठिकाणी हिशोब, प्रोसीडिंग्ज व्यवस्थित ठेवले जात नाही. मालमत्तेची परस्पर विल्हेवाट, मालमत्तेस हानी, नुकसान पोहोचविणे, गंभीर अनियमितता इ. संदर्भी संबंधित न्यासाचे विश्वस्तांस वैयक्तिक जबाबदारी धरून त्यांचे विरुद्ध कारवाई होण्यासाठी दाखल करावयाच्या दावे/तक्रार अर्जा सबंधी या कलमात उहापोह आहे. संबंधितांचे म्हणणे ऐकूण घेवून सादर न्यासाचे पुराव्याची सत्यता पडताळून न्यायाचे सभासदांचे हित जपण्यासाठी निर्देश देण्याची तरतूद आहे. न्यासाचे नुकसानीस विश्वस्त मंडळ जबाबदार ठरले तरी न्यासाची नोंदणी करता येत नाही असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात नुकताच दिला आहे.

**कलम ४१ (AA) – नवीन तरतूद :–**

ही तरतूद चॅरीटी हॉस्पीटल धर्मादाय रुग्णालया संदर्भात आहे. अशा हॉस्पिटलमध्ये गरीब– गरजू रुग्णांसाठी १०% बेडस राखीव ठेवण्यात येते. रू १५,०००/– वार्षिक उत्पन्न असलेल्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया / औषधे मोफत उपचार आहे. मात्र संबंधित रुग्ण दुसऱ्या अन्य वैद्यकीय लाभार्थी असता शासकिय सेवा सुविधांचा लाभ घेता कामा नये गरीब गरजू रूग्णांसाठी विशेष निधीची तरतुद असते. आर्थिक वर्षात असे रुग्ण आले नाही तर त्यांच्यासाठी राखीव असलेला निधी अन्य कार्यासाठी  वळविता येत नाही.

**कलम ४१ (ब) :–** न्यासाचे त्याचे उदिष्टांप्रमाणे कार्य होत नसेल, विश्वस्त मालमत्तेचा व निधीचा वापर स्वार्थासाठी करीत असतील तर अशा संस्थेविरूद्ध आयुक्तालयाकडे तक्रार दाखल करता येते, त्याची कलम ३७ (१) प्रमाणे चौकशी प्रक्रिया पूर्ण करूण धर्मदाय आयुक्तांना योग्य ते निर्देश देण्याचे अधिकार आहेत. दंगल/पूर/नैसर्गिक आपत्ती इ. कारणांमुळे संबंधितांच्या पुनर्वसनासाठी निधीसंकलन करता येते. त्यासाठी निधीसंकलनापूर्वी १५ दिवस आगोदर धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेणे आवश्यक असते ही परवानगी सहा महिन्यापुर्ती स्तिमित असते. त्यानंतर निधीसंकलन / विनियोगाची हिशोबपत्रके सादर करणे बंधनकारक आहे.

वरील सर्व तरतुदीचा मागोवा घेतल्यास विश्वस्तांमध्ये समन्वय प्रेम, विश्वास, असायला हवा. संस्था उदिष्टानुसार कार्य, सभेचे परिपत्रक, इतिवृत्त, हिशोब पत्रके अद्ययावत ठेवून मालमतेचे व्यवस्थित जतन केल्यास कोणाच्याही तक्रारीस वाव राहणार नाही. अप्रिय कार्य घडल्यास, निधीचा दुरुपयोग झाल्यास, पदाच्या तक्रारी होतात. या तक्रारी कलम ४१ ब चे तरतुदीनुसार करण्यास वाव आहे. त्याचा गांभीर्याने विचार करून विश्वस्तांनी विश्वस्ताच्या भुमिकेतून निस्पृहतेने ते कार्य करीत राहिल्यास विश्वस्तांनी कायद्याची माहिती आत्मियतेने करुन घेतल्यास व आपणच तयार करून घेतलेली घटना, नियम नियमावली समजावून घेऊन त्याप्रमाणे न्यासाचे व्यवस्थापन सांभाळले पाहिजे. परिणामी, संस्था स्थापनेमागील संस्थापकांच्या तळमळीचा सेवाभाव फलिताने अधिक संस्थावृद्धी होईल. व जनकल्याणासाठी सदैव क्रियाशील राहील.

सहकार बँकिंग लेखक चळवळीसह विश्वस्त संख्या कायद्याचे अभ्यासक व क्रियाशील कार्यकर्ते आहेत.

**– अशोक कुरापाटी, अ.नगर. मोबाईल – ९८९०६९७५९३** ****


खादी और ग्रामोद्योग आयोग
सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकार
Khadi India
MSME
सूक्ष्म, लघु एवं मध्यम उद्यम
MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES

**सोन्याच्या दागिन्यांचे फेरमूल्यमापन तुम्ही बँकेत केलेले आहे का?**

**ज्या दागिन्यांवर तुम्ही सोने तारण कर्ज दिले आहे ते दागिने खरे आहेत का?**

**बँकेचे कर्मचारी, सोनार आणि गोल्ड मूल्यांकन यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळा पुण्यामध्ये...!!**

**प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर शासनमान्य प्रमाणपत्र मिळेल.**







**संपर्क : 9881714157 / 7249430843 / 7219432658**

**ईमेल : puneprashikshan1@gmail.com / puneprashikshan@yahoo.in**


## आर्य चाणक्य पतसंस्थेला पावणे चार कोटींचा नफा

**इचलकरंजी** – येथील आर्य चाणक्य सहकारी पतसंस्थेला नुकत्याचा संपलेल्या आर्थिक वर्षात पावणे चार कोटींचा ढोबळ नफा झाला आहे तर ठेवी २२२ कोटी इतक्या झाल्या आहेततर कर्ज वाटप १५० कोटी आहे. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र राशिनकर यांनी सांगितली. ठेवीमध्ये ३६ कोटी रूपयांची वाढ झाली आहे असे ते म्हणाले.

गेल्या वर्षी संस्थेने ३७२ कोटीचा मिश्र व्यवसाय केला आहे तर निव्वळ एनपीए शून्य टक्के आहे. संस्थेला ३ कोटी ७५ लाख रुपये नफा झाला आहे.

## कल्याण जनता बँकेच्या वतीने महिला दिन साजरा

**कल्याण** – दि कल्याण जनता सहकारी बँकेच्या वतीने महिला दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ शिक्षिका खानापूरकर मॅडम तसेच श्रीभगवद्गीतेचे तत्वज्ञान सोप्या भाषेत सामान्य जनांपर्यंत पोहोचवणाऱ्या मंजिरी फडके अश्विनी साठे उत्कर्ष महिला मंडळाच्या पदाधिकारी मेधा आघारकर उपस्थित होते.

दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक बँकेच्या अधिकारी निशा दलाल यांनी व्यवस्थापिका श्रीमती स्नेहल कुलकर्णी यांनी डिजिटल बँकिंग या विषयावर माहिती सांगितली वरिष्ठ अधिकारी उज्वला पाठक यांनी महिलांविषयी 'स्त्री शक्ती' यावर तर अधिकारी दाणी सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्र संचालन सुप्रिया खंडकर यांनी केले. डेप्युटी मॅनेजर नेहा वाड यांनी आभार मानले.

# सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेने लावलेल्या दंडांची, आयकरासाठी वजावट मिळू शकते

एखाद्या व्यवसायात अनेकदा असे काही खर्च करावे लागतात, की ते त्या व्यवसायाशी संबंधित तर असतात, पण आयकर कायद्याखाली त्याची वजावट मात्र मिळत नाही.



सीए उदय कर्वे
९८१९८६६२०१

या संदर्भात आयकर कायद्याचे कलम ३७ हे एक महत्त्वाचे कलम ठरते. कलम ३० ते ३६ मधे ज्यांचे उल्लेख आले आहेत असे विशिष्ट खर्च सोडून, व्यवसायासाठी केलेल्या बाकी सर्व नैमित्तिक खर्चाची वजावट या कलमाखाली मिळते. म्हणजे खरे तर करपात्र उत्पन्न ठरवताना, व्यवसायविषयक निरनिराळ्या अनेक खर्चांची वजावट देणारे, असे हे कलम आहे.

त्या कलमातील एका खुलाशामध्ये असे लिहिले आहे की (अ) जे खर्च अशा हेतूंसाठी केले आहेत की ते हेतू हे कायद्याने अपराध मानले आहेत, किंवा (ब) जे खर्च करणे हे कायद्याने प्रतिबंधित आहे, असे कुठलेही खर्च हे व्यवसायासाठी झाले आहेत असे मानण्यात येणार नाही आणि त्यांची वजावट मिळणार नाही. उदाहरण द्यायचे म्हटले तर कारखान्याचे रासायनिक सांडपाणी थेट नदीत सोडण्याकरता पाइपलाइन टाकली तर तो खर्च उपरोक्त (अ) मध्ये येईल आणि एखाद्या कामासाठी सरकारी अधिकाऱ्याला दक्षिणा दिली तर तो खर्च उपरोक्त (ब) मध्ये येईल आणि त्या खर्चाची वजावट, करपात्र नफा ठरवताना, मिळणार नाही.

बँकांच्या बाबतीत, रिझर्व्ह बँकेने त्यांच्यावर लावलेल्या दंड-रकमांची वजावटसुद्धा, हाच खुलासा वापरून नाकारली जात आहे. कायद्याचे पालन न करणे हा गुन्हा/अपराध आहे आणि बँकिंगविषयक कायद्यांचे पालन केले नाही म्हणूनच दंड लागत असणार, म्हणजेच असा दंड हा अपराधापोटीच /गुन्ह्यापोटीच भरावा लागतो आणि म्हणून त्याची वजावट देता येणार नाही असा काहीसा तर्क यासाठी वापरला जातो. अनेक बँकांमध्ये त्यांचा स्वतःचाही असा दृढ समज असतो की रिझर्व्ह बँकेने लावलेल्या दंडाची, आयकर कायद्याखाली खर्च म्हणून वजावट मिळणारच नाही. म्हणून त्या बँका त्यांच्या इन्कम टॅक्स रिटर्नमध्ये करपात्र उत्पन्न ठरवताना, ती रक्कम स्वतःहूनच नामंजूर करून घेत असतात. असो.

या संदर्भात आयकर कायद्याखाली आत्तापर्यंत जे निकाल दिले गेले आहेत त्यांतील काही निकाल बँकांच्या/करदात्यांच्या बाजूचे असून त्यांत असे काही दंड, हे वजावट म्हणून मंजूर करण्यात आले आहेत. लागलेला प्रत्येक दंड हा थेट कायद्याच्या भंगासाठीच असतो वा ज्याला अपराध/ गुन्हा म्हणता येईल अशा कृत्यांपोटीच लागलेला असतो असे मानण्याचे कारण नाही, असे यांत सांगितले गेले आहे. अशा काही मोजक्या निकालांचा या लेखात ऊहापोह केला आहे.

सहकारी बँकांना या निकालांचा खूप उपयोग होईल असे वाटते, कारण सध्या अनेक प्रकारच्या छोट्या-मोठ्या कारणांवरून रिझर्व्ह बँक बँकांना बरेच दंड लावत आहे. तो दंड भरायचा आणि करपात्र उत्पन्न काढताना त्याची वजावट पण घ्यायची नाही असा दुहेरी तोटा या बँका सोसत आहेत. त्यांना या लेखात उल्लेख केलेल्या निकालांचा व त्यांतील तपशिलाचा उपयोग होऊ शकतो.

*** निकालांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे -**

**युनियन बँक प्रकरण :-** इन्कम टॅक्स अपीलेट ट्रायब्यूनल मुंबई यांनी नुकताच, जानेवारी २०२५ मध्ये, यासंबंधात एक निकाल दिला आहे. सदर निकाल युनियन बँक ऑफ इंडिया या बँकेच्या प्रकरणात आहे. त्या बँकेवर रिझर्व्ह बँकेने २५ लाख रुपये दंड आकारणी केली होती. रिझर्व्ह बँकेने नमूद केलेल्या काही 'प्रोसीजरल गाईडलाईन्स'चे त्या बँकेकडून पालन न झाल्याने सदर दंड लावण्यात आला होता. या प्रकरणात असा मुद्दा चर्चिला गेला की, बँकांकडून होणाऱ्या काही प्रकारच्या चुका/त्रुटी या अशा प्रकारच्या असतात की त्यांचेसाठी बँकिंग संबंधित कायद्यांमध्ये दंडाची तरतूद आहे, पण त्या बाबींसाठी फौजदारी कारवाईची तरतूद नाही. म्हणजेच, सदर दंड लागण्याच्या कारणांमागे कुठलाही गुन्हा किंवा अपराध असा विषय नसून सदर दंडाचे स्वरूप हे केवळ 'सिव्हिल लायबिलिटी' असे आहे. तसेच, यांत थेटपणे कुठल्याही कायद्याच्या तरतुदींची मोडतोड घडलेली नसते. त्यामुळे अशा दंड रकमांना कलम ३७ चा खुलासा लागू होत नाही, व त्या रकमा खर्च म्हणून वजावटीस पात्र ठरतात. (याच बँकेच्या बाबतीत अशाच विषयात आधी पण एक असाच निकाल दिला गेला होता. त्यामुळे 'निकालसातत्य' हाही मुद्दा हा निकाल देताना विचारात घेण्यात आला. तसेच मुंबई हायकोर्टाने में. स्टॉक अँड बाँड ट्रेडिंग कंपनी या केसमध्ये दिलेल्या निकालाचेही अनुकरण यामध्ये करण्यात आले आहे. आयकर खात्याच्या प्रतिनिधीनेही बँकेच्या युक्तिवादास जोरदार विरोध केला नाही, असेही या आदेशात नमूद केले आहे.)

*** आयडीबीआय बँक प्रकरण -** दुसऱ्या एका प्रकरणात मात्र बँक आणि आयकर खाते अशा दोन्ही बाजूंनी जोरदार युक्तिवाद झाला आणि तरीही 'बँकेने रिझर्व्ह बँकेकडे भरलेल्या दंडाची, आयकर कायद्याखाली, खर्च म्हणून वजावट मिळेल' असाच निकाल देण्यात आला. ते प्रकरण आयडीबीआय बँकेचे होते व तेही मुंबई ट्रायब्यूनल पुढेच होते. त्याचा निकाल फेब्रुवारी २०२१ मध्ये देण्यात आला आहे.

सदर प्रकरणात त्या बँकेवर रिझर्व्ह बँकेने १५ लाख, आणि ९४ हजार दोनशे, असे दोन वेगवेगळे दंड आकारले होते. ग्राहक सेवा, छोट्या रकमांच्या नोटा, खराब नोटा, अशा काही विषयांत रिझर्व्ह बँकेने दिलेल्या गाईड लाईन्स पाळण्यात आल्या नाहीत म्हणून हे दंड लावण्यात आले होते. बँकेचे करपात्र उत्पन्न ठरवताना सदर दंडाची खर्च म्हणून वजावट मिळेल असाच निकाल याही केसमधे देण्यात आला.

*** या प्रकरणात बँकेच्या बाजूने खालील निकालांचा आधार घेण्यात आला.**

**(१) मे. स्टॉक अँड बाँड ट्रेडिंग कंपनी (मुंबई हायकोर्ट) :-** यात म्हटले आहे की स्टॉक एक्स्चेंजसारख्या नियामकांनी केलेल्या नियमांचे पालन न झाल्याने लागणारे दंड, हे एखाद्या गुन्ह्यापोटी/अपराधापोटी आहेत असे मानता येणार नाही व कलम ३७ मधील खुलासा वापरून त्यांची खर्च म्हणून वजावट नाकारता येणार नाही.

**(२) बापूनगर महिला को-ऑपरेटीव्ह बँक (अहमदाबाद ट्रायब्यूनल) :-** यात म्हटले आहे की, एखाद्या दंडाचे परिणाम/स्वरूप हे प्रामुख्याने कॉम्पेन्सेटरी (भरपाई प्रकारचे) असेल आणि पिनल (फौजदारी कारवाई होईल असे) स्वरूपाचे नसेल, तर असे दंड हे खर्च म्हणून वजावट मिळण्यास पात्र असतील. या निकालात केरळ हायकोर्टाच्या कॅथोलिक सीरियन बँक प्रकरणातील निकालाचा उल्लेख करून त्याचे अनुकरण करण्यात आले आहे.

**(३) मंगल केशव सिक्युरिटीज लिमिटेड (ट्रायब्यूनल) :-** यांत असे म्हटले गेले की रोजच्या नियमित/ नैमित्तिक कामकाजात काही प्रोसीजरल त्रुटी राहिल्या/ चुका झाल्या, तर त्यासाठी लागणारे 'रूटीन' स्वरूपाचे दंड/शास्ती या 'प्यूनीटिव्ह' नव्हे तर 'कॉम्पेनसेटरी' स्वरूपाच्या असतात

**पुढील पानावर...**

# गुजरातमधील त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक राज्यसभेत मंजूर


**नवी दिल्ली –** देशातील सहकारी संस्थासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे, यासाठी गुजरात मधील आणंद येथे त्रिभुवन सहकारी विद्यापीठ स्थापन करण्याचे विधेयक राज्यसभेने नुकतेच मंजूर केले आहे. राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करून शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधन यासाठी व्यापक, एकात्मिक आणि प्रमाणित रचना तयार करणे, यासाठी विद्यापीठ काम करणार आहे.

*** नव विद्यापीठाच्या माध्यमातून नवीन उद्योग आणि नवनिर्मितीला चालना –** याबाबत अधिक माहिती देताना केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले, देशातील साडे आठ लाखांपेक्षा अधिक सहकारी संस्था असून त्यात ३० कोटींपेक्षा अधिक सदस्य आहेत. नव विद्यापीठाच्या माध्यमातून नवीन उद्योग आणि नवनिर्मितीला चालना मिळणार आहे. केंद्रातील सरकार राष्ट्रीय सहकार धोरण लवकरच आणणार आहे, असेही त्यांनी सांगितले. नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात ११९० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गेल्या साडेतीन वर्षांत सहकार मंत्रालयाने अभूतपूर्व काम केले आहे. सहकार मंत्रालयाने नव्याने २ लाख नवे पॅक्स स्थापन करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. त्यातील १४ हजार स्थापन झाले आहेत, अशी माहिती त्यांनी सांगितली.



**केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ**

## सहकार क्षेत्राच्या नव्या युगाचा प्रारंभ



हर्षवर्धन पाटील

**नवी दिल्ली –** देशामध्ये प्रथमच त्रिभुवन सहकारी विद्यापीठाची स्थापना करण्यात येत असून ही सहकार चळवळीसाठी नव्या युगाची सुरुवात असणार आहे. परिवर्तन घडवून आणण्याचे काम हे विद्यापीठ ज्ञानकेंद्र म्हणून काम करेल असा विश्वास राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केला आहे. सहकार क्षेत्रासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय हा दूरगामी आणि नव्या युगाची सुरुवात करून देणारा आहे असे नमूद करून ते म्हणाले, या निर्णयामुळे सहकार क्षेत्राला बळकटी मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी दूरदृष्टी दाखवून हा निर्णय घेतला असून तो नक्कीच स्वागतार्ह आहे. विद्यापीठाच्या माध्यमातून सहकार विषयक विशेष अभ्यासक्रम सुरू करता येणार आहेत. त्याचप्रमाणे २८४ पेक्षा अधिक प्रशिक्षण संस्थांना यामुळे बळकटी मिळणार आहे, असे त्यांनी नमूद केले.

# सहकार भारती मीरा-भाईंदर स्वयंसिध्दा फाउंडेशन आयोजित 'महिला सक्षमीकरण' परिषद यशस्वी

**पालघर –** सहकार भारती मीरा-भाईंदर जिल्हा व स्वयंसिध्दा फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनाचे निमित्याने 'महिला सक्षमीकरण' या विषयावर 'अनुभूती' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र बँक फेडरेशनच्या उपाध्यक्ष व सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश महिला प्रमुख वैशाली आवाडे यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले.

टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष व सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश बँक प्रकोष्ट प्रमुख शरद गांगल प्रमुख अतिथी व आमदार नरेंद्र मेहता सहकार भारती प्रदेश संघटन प्रमुख शरद जाधव उपस्थित होते. महिला दिनाच्या कार्यक्रमाची सुरुवात पोवाडा सादरीकरण करून झाली. उद्घाटनानंतर आमदार मेहता यांनी मार्गदर्शन करून मीरा-भाईंदरमध्ये खास महिलांकरता म्हणून स्कील सेंटर उभारण्यात येईल असे जाहीर केले. आवाडे यांनी 'कुटुंब प्रबोधन' करीत महिला शक्तीचे काम काय असावे, याबाबत मार्गदर्शन केले. बँक अध्यक्ष गांगल यांनी बँकिंगबाबत माहिती देत महिला उद्योजकांना टीजेएसबी बँक सहकार्य करण्यास तयार आहे, असे आश्वासित केले. स्वयंसिद्धा संस्थेचे सचिव विजय जोशी यांनी महिला उद्योजकांना उद्योग सुरू करण्याकरता काय काळजी घ्यावी तसेच सरकारी योजना कोणत्या व कशा प्रकारे आहेत याबाबतची सविस्तर माहिती सांगितली. स्वयंसिध्दाचे अध्यक्ष भूषण पैठणकर यांनी स्वयंसिद्धाची माहिती देत स्वयंसिद्धा काय करू शकते, याबाबतचे निवेदन केले.

स्वयंसिद्धा २००६ पासून कार्यरत असून महिला उद्योजकांना सर्व प्रकारचे मार्गदर्शन करीत आहे. यावेळी संकेतस्थळाचे उद्घाटन सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश संघटन प्रमुख शरद जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. ही वेबसाईट सर्व उद्योजकांना उपयुक्त व मार्गदर्शन ठरणार आहे. महाराष्ट्रातील महिला उद्योजिका या वेबसाईटवर जाऊन उद्योगाबाबतची माहिती प्रदर्शित करु शकते.

महिला दिन व मातृदिन यावर शरद जाधव यांनी मार्गदर्शन केले. महिला उद्योजकांना महिला सक्षमीकरण करता कराव्या लागणाऱ्या बाबींबाबत विमोचन केले.

# सहकारी बँकांना रिझर्व्ह बँकेने लावलेल्या दंडांची, आयकरासाठी वजावट मिळू शकते

व त्यांची खर्च म्हणून वजावट देण्यात यावी.

विशेष म्हणजे, आयडीबीआय बँकेच्या या प्रकरणात आयकर खात्याकडून एएनझेड ग्रिनडलेज बँकेचा निकाल उद्धृत करण्यात आला, ज्यात सुप्रीम कोर्टाच्या एका निकालाचा आधार घेत असे म्हटले आहे की, रिझर्व्ह बँकेच्या गाईडलाईन्स/डायरेक्टिव्हस यांचे स्वरूप एखाद्या कायद्याप्रमाणेच असते व त्यामुळे, रिझर्व्ह बँकेने लावलेल्या दंड रकमांची खर्च म्हणून वजावट मिळणार नाही. पण ट्रायब्यूनलने असे नमूद केले कि, त्या निकालांपेक्षा उपरोक्त निकाल हे प्रस्तुत प्रकरणांत नेमकेपणाने लागू होत आहेत आणि शेवटी आयडीबीआय बँकेच्या बाजूने असा निकाल देण्यात आला की रिझर्व्ह बँकेने आकारलेली दंड रक्कम ही आयकर वजावटीस पात्र आहे.

या अशा काही निकालांचे तात्पर्य म्हणजे, कुठल्याही रकमेसाठी पेनल्टी किंवा फाईन (दंड) असा शब्द वापरण्यात आलेला असेल तर लगेच त्याची आयकर कायद्याखाली वजावट मिळणारच नाही, असे मानण्याचे कारण नाही. ज्या कारणांसाठी तो दंड लागला आहे ती पार्श्वभूमी ध्यानात घेऊन, उपरोक्त निकाल व या विषयातले अन्य ज्ञात निकाल लक्षात घेऊन, आपापल्या कर सल्लागारांशी त्याबाबतीत योग्य ती सल्लामसलत करणे आवश्यक आहे. आणि ही सल्लामसलत इनकम टॅक्स रिटर्न आणि टॅक्स ऑडिटशी संबंधित फॉर्म क्र. ३- सीडी बनवतानाच करणे हितकर राहील, कारण सदर फॉर्ममध्येसुद्धा कायदेभंग/अपराध/गुन्हा यासंबंधातील खर्च/दंड/शास्ती यांचा उल्लेख, आणि अन्य दंड/शास्ती यांचा उल्लेख, वेगवेगळ्या रकान्यांत करावयाचा आहे. अशा अभ्यासांमुळे आणि सल्लामसलतींमुळे, त्या त्या विशिष्ट परिस्थितीत अशा अनेक प्रकारच्या दंड रकमांची वजावट मिळवण्यात, सहकारी बँकांनासुद्धा यश येऊ शकते. अर्थात या विषयात दोन्ही बाजूने निर्णय आहेत व तसे ते यापुढेही येऊ शकतात हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक दंडरक्कम आयकराच्या वजावटीस अपात्र नसते हे जेवढे खरे आहे, तेवढेच हेही खरे आहे कि सरसकट प्रत्येकच दंड रकमेची वजावट मिळेलच असेही नाही.

**– सी.ए. उदय कर्वे (लेखक वैधानिक लेखापरीक्षक असून सहकारी बँकिंग क्षेत्राशी निगडित आहेत.)**

**दूरभाष :** ९८१९८६६२०१ **ई-मेल :** umkarve gmail.com

*****

# बँकिंग रेग्युलेशन कायदा आणि नवीन बदल



डॉ. अभय मंडलिक
९४०३० ८०७२५

बँकिंग रेग्युलेशन कायदा १९४९ मध्ये काल सुसंगत नवीन बाबींच्या अनुषंगिक दृष्टीने बदल करण्यात आला आहे. याचा संदर्भ रिझर्व बँक ऑफ इंडिया आणि स्टेट बँक ऑफ इंडियाशी असल्यामुळे स्टेट बँक ऑफ इंडिया आणि रिझर्व बँक ऑफ इंडिया कायद्यांमध्ये देखील बदल करण्यात आलेला आहे. या बदलाला लोकसभेने हिवाळी अधिवेशनात मंजुरी दिली आहे, तर राज्यसभेने नुकतीच या बदलाला मान्यता दिली आहे. माननीय राष्ट्रपती यांच्या सहीनंतर हा कायद्यातील बदल लवकरच अस्तित्वात येणार.

**※ बँकिंग रेगुलेशन कायद्यातील बदलाचा गोषवारा याप्रमाणे –**

१) रोख राखीव ठेवीसाठी (सी आर आर) पंधरवड्याची नवीन व्याख्या करण्यात आली आहे. सी. आर. आर. साठी रिझर्व बँकेमध्ये बँकांनी करंट खात्यात रक्कम ठेवणे बंधनकारक आहे. पंधरवड्याची व्याख्या बदलण्यात आली असून एक ते पंधरा पर्यंत पहिला पंधरवडा आणि १६ ते महिना अखेर पर्यंत दुसरा, अशी नव्याने व्याख्या करण्यात आली आहे. पूर्वी शेवटचा शुक्रवार यावर आधारित ही व्यवस्था होती.




२) सहकारी बँकांमधील संचालकांचा कार्यकाळ वाढविण्यात आला आहे. अध्यक्ष व पूर्णवेळ संचालक वगळून संचालकांसाठी आता आठ वर्षांऐवजी दहा वर्षे असा कार्यकाळ करण्यात आला आहे.

३) केंद्रीय सहकारी बँकेतील डीसीसी संचालक जर राज्य सहकारी बँकेचा सदस्य असेल तर तो त्या बँकेच्या संचालक मंडळावर काम करू शकेल.

४) बँकेचे खातेदार ठेवी आणि लॉकरसाठी एकापेक्षा अधिक नॉमिनींची नियुक्ती करू शकतील. याचे उदाहरण म्हणजे ठेवीदार आपल्या ठेवीचे नॉमिनेशन एकापेक्षा अधिक व्यक्तींसाठी करू शकेल. मात्र हे करताना त्याला प्रत्येक ठेवीदाराला किती हिस्सा द्यायचा हे ही स्पष्ट करावे लागेल. अनिल कुलकर्णी यांनी त्यांच्या ठेवींसाठी अनुक्रमे अ, ब, क आणि ड यांना नॉमिनी नेमले तर प्रत्येकासाठी हिस्सा किती असेल हे त्याच वेळी ठरवावे लागेल.

वरील उदाहरणात – अ ला १० टक्के, ब ला ३० टक्के, क आणि ड यांना प्रत्येकी ३० टक्के. अशा पद्धतीने नॉमिनेशन करता येऊ शकेल.याशिवाय ठेवीदाराला नॉमिनींचा क्रमही ठरवता येऊ शकेल उदाहरणार्थ – १) अ ही व्यक्ती अनिलच्या पश्चात पूर्ण रक्कम स्वीकारेल. २) अनिल आणि अ दोघेही हयात नसतील तर ब ही रक्कम स्वीकारेल. ३) अनिल, अ आणि ब तिघेही हयात नसतील अशावेळी क ही रक्कम स्वीकारेल.

अशाप्रकारे एकत्र किंवा क्रमानुसार नॉमिनेशन करता येऊ शकेल. लॉकरच्या बाबतीत टक्केवारीचा विषय नसेल, परंतु तेथे क्रमानुसार नॉमिनी नियुक्त करता येईल.

**※ कायद्यातील बदलाचे महत्त्व –**

१) पंधरवड्याची व्याख्या बदलत असताना याबाबतीत जी जुनी ब्रिटिश परंपरा होती. तिचा त्याग करून एक ते पंधरा आणि १६ ते महिनाअखेर अशी सुटसुटीत व्याख्या करण्यात आलेली आहे.

२) सहकारी बँकांच्या संचालकांच्या मुदतीबाबतचा बदल सहकार कायद्याशी सुसंगत असा आहे. सहकार कायद्यानुसार निवडणुका पाच वर्षानंतर होतात. त्याचा विचार करून एक संचालक जास्तीत जास्त दोन टर्म संचालक होऊ शकतो, असा याचा अर्थ आहे. दहा वर्षानंतर कूलिंग पिरेड घ्यावा लागेल आणि त्यानंतरच पुन्हा निवडणूक लढवता येईल. नागरी सहकारी बँकात नवीन नेतृत्व यावे आणि जुन्या लोकांनी कायमस्वरूपी संचालक मंडळात राहू नये. या रिझर्व बँकेच्या विचारसरणीला अनुसरूनच हा बदल आहे. या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी नागरी सहकारी बँकांना निवडणुकांच्या आधी ज्यांची मुदत दहा वर्षांची झालेली आहे, अशा संचालकांच्या जागी योग्य संचालकांबाबत विचार करून ठेवावा लागेल. संचालक पदासाठी योग्य असलेली पात्रता धारण करणारी व्यक्ती, तिला योग्य वेळेमध्ये सभासद करून घ्यावे लागेल आणि नंतरच ती व्यक्ती निवडणुकीसाठी पात्र ठरेल. निवडणुकांच्या साधारण दोन अडीच वर्षे आधी हे नियोजन सुरू करावे लागेल.

ज्या संचालकांची मुदत दहा वर्षांपेक्षा अधिक आहे, अशा संचालकांबाबत रिझर्व बँकेच्या अंतर्गत तपासणीमध्ये अलीकडच्या काळात उल्लेख करण्यात आलेले आहेत. याबाबतीत अद्यापपर्यंत कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यात आलेली नाही.

या कायद्याच्या अस्तित्वानंतर मात्र सर्व तरतुदींबाबत रिझर्व बँक काटेकोर विचार करणार आहे, याचा विचार करून नागरी सहकारी बँकांनी आपले निवडणूक विषयक धोरण योग्य वेळी ठरवणे गरजेचे आहे. बँकिंग रेग्युलेशन कायद्यातील हे सर्व बदल आवश्यकच होते. रिझर्व बँकेला नियंत्रणाच्या दृष्टीने आणि नागरी सहकारी बँकांना परिचालनाच्या दृष्टीने या बदलाचा निश्चित फायदा होणार आहे.

**– डॉ. अभय मंडलिक**

**(लेखक खामगाव अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व बँकिंग क्षेत्राचे अभ्यासक आहेत.)**

*****

कर व व्यापारी विषयक कायद्यातील
क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत
माहितीसह आर्थिक गुंतवणूक,
आरोग्याविषयी माहिती देणारे
व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ
स्थापना १९५०
व्यापारी मित्र
मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.
संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा
मासिकाची वर्गणी खालील प्रकारे भरु शकता.

| | वर्ष ३ | वर्ष २ | वर्ष १ |
|---|---|---|---|
| साध्या पोस्टाने | २५०० | १७०० | ९०० |
| रजिस्टर पोस्टाने | ३६०० | २४०० | १२६० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com



दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ
THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL
॥ साहसे श्री : प्रतिवसति ॥
Regd.No.YML/BNK/114
मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 - Phone : 07232 - 244241, 243703, 237442
E-mail : ho_adm@yavatmalurbanbank.com - Website : www.yavatmalurbanbank.com
कर्जाचे
अत्यंत माफक
व्याज दर
8.25%*
पासुन सुरू
* नियम व अटी लागू.
आम्ही जपतो
वारसा
विश्वासाचा
डॉ. नितीन खर्चे अध्यक्ष
अजिंदरसिंह चावला उपाध्यक्ष
श्रीधर कोहरे मुख्य कार्यकारी अधिकारी
संचालक - श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री.आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री.प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री.संजय चिंतामणराव डेहणकर, श्री.प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड.श्री.प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री.गोवर्धन दयाराम राठोड, श्री.परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ.श्री.महेश दामोधर सारोळकर, श्री.वसंता रामजी सुपारे, श्री.संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ.शिला राजेश्वर निवल, श्री.नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक), ॲड.श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

## श्री ज्ञानेश्वर नागरी पतसंस्थेला ३.११ कोटी नफा

**जळगाव जामोद –** श्री ज्ञानेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेने यंदाच्या २४–२५ या आर्थिक वर्षात दमदार प्रगती केली असून, संस्थेचे मुदत ठेवीवरील व्याजदर इतर पतसंस्थेच्या तुलनेत कमी असतांना सुद्धा गत आर्थिक वर्षाच्या तुलनेत संस्थेच्या एकूण ठेवींमध्ये तब्बल ११ कोटींची वाढ झाली. संस्थेच्या एकूण ठेवी १०६ कोटी झालेल्या आहेत. कर्ज वाटप पाहता एकूण नफ्यात एक कोटींने वाढ झालेली असून, संस्थेला यंदा ३.११ कोटी नफा झाला आहे

संस्थेच्या आर्थिक प्रगतीमध्ये संस्थेचे अध्यक्ष – ओमप्रकाश राठी, उपाध्यक्ष– सचिन देशमुख सचिव – अनुप पुराणिक, संचालक – विशाल भगत, अरुण खिरोडकार, शंकरराव ताडे, मोतीलाल राठी, हरिदास माटे, अनिता जयस्वाल, ज्योतीताई राजपोपट, कैलास डोबे, वर्षाताई गिरी, रामदास बंबटकार, अरुण पाऊलझगडे, सर्व पदाधिकारी तथा संचालक सदस्य/सदस्या संस्थेच्या थकबाकी वसुलीकरिता मार्गदर्शन लाभले.

## वसंतराव चौगुले नागरी पतसंस्थेच्या ठेवीत वाढ

**कोल्हापूर –** येथील वसंतराव चौगुले नागरी सहकारी पतसंस्थेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात एक हजार कोटीच्या व्यवसायाकडे वाटचाल सुरू ठेवली असून गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर नव्याने १७ कोटींच्या ठेवी संकलित करण्यात आल्या आहेत. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक अनिल पाटील यांनी सांगितली.

संस्थेने कोअर बँकिंग प्रणालीचा अवलंब करून सदस्य आणि ग्राहकांचे हित यावर अधिकाधिक भर दिला आहे. ऑनलाइन सुविधेमुळे कोणत्याही शाखेत रक्कम जमा करण्यासाठी सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. याबरोबर वीज बिल केंद्र, लॉकर्स सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. संस्थेला 'अ' लेखा परीक्षण वर्ग मिळाला आहे.

# राज्य सहकारी बँकेची संस्थात्मक प्रशासक म्हणून नियुक्ती

**पुणे –** सहकारी बँकिंग क्षेत्रात प्रथमच नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर राज्य सहकारी बँकेची प्राधिकृत अधिकारी संस्थात्मक प्रशासक म्हणून सरकारच्या वतीने नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे नागपूर जिल्हा सहकारी बँकेच्या सक्षमीकरणासाठी हातभार लागणार आहे. तसेच अनेकविध उपक्रम राबविता येणे शक्य होणार आहे.

राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितले की, आगपूर जिल्हा बँकेचा सेवकवर्ग थकीत कर्जदार यांनी सहकारी केल्यास आणि ठेवीदारांनी संयम ठेवल्यास नागपूर जिल्हा सहकारी बँक पूर्वपदावर येण्यास मदत होणार आहे. राज्य सहकारी बँकेचे नेटवर्थ ५०४४ कोटी झाले असून स्वनिधी ७१२१ कोटी आहे तर २३ हजार ५८३ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेचा नफा ६१५ कोटी असून एनपीए ९.१५ टक्के आहे.

## पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी रश्मी भोसले, उपाध्यक्षपदी शामराव हुलावळे

**पुणे –** पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी माजी नगरसेविका रश्मी भोसले आणि उपाध्यक्षपदी शामराव हुलावळे आणि मानद सचिव म्हणून संतोष भेगडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून बी. एल. साबळे यांनी काम पाहिले. पदाधिकाऱ्यांची निवड पांच वर्षांसाठी असणार आहे. संस्थेच्या नूतन संचालक मंडळाची नुकतीच बैठक झाली. त्यामध्ये नूतन पदाधिकारी निवडण्यात आले.


# सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड

## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. माधवेंद्र कोरडे** - (फक्त मेसेजसाठी) **९८५०५७१४०५**

**श्री. श्रीकांत पटवर्धन** (प्रदेश कार्यालय प्रमुख) **९२२५८२५३९९**

सहकार भारती पुणे कार्यालय – फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com

**सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती - संपादक**

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

**श्री. विनायक भिसे :** रिजनल हेड (पश्चिम महाराष्ट्र व कोकण) 9923396312

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| सांगली | सौ. श्वेता कुलकर्णी | 8830837005 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर शहर | सौ. दिपाली कुलकर्णी | 9049785111 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-दहिसर | श्री. हितेश वाघेला | 8828384482 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| वसई | श्री. संतोष शिंदे | 8652415015 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |
| पनवेल | श्री. संजय पावसकर | 8928323997 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| चाळीसगाव, जळगाव | ॲड. विकास देवकर | 7588440640 |
| धुळे | श्री. बी. एम. कुलकर्णी | 9420602441 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. अभय बावस्कर | 9422202569 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| लातूर | श्री. शरद दिवे | 8275020460 |
| परभणी | श्री. संतोष पाथरीकर | 9763012439 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |

**पुस्तकांसाठी संपर्क : ८८०५९ ८१६७३**

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-
वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 078011100000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**


धनश्री नागरी सहकारी पतसंस्था मर्या. तळोधी (बा.)
रजि. नं. ११०१/१९९४
मुख्यालय तळोधी (बा.)
सर्व भागधारकांना
गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा
शाखा : तळोधी, नागभीड, नेरी, भिसी, राजोली, मुल व पोम्भूर्णा
श्री. सुभाष पाकमोडे
अध्यक्ष
डॉ. विजय आकुलवार
उपाध्यक्ष
मा. मनोज हंबर्डे
मुख्य प्रवर्तक
सौ. स्मिता हांडेकर
सचिव
श्री. सुखदेव भाकरे
संचालक
श्री. सुरेशजी सेलोकर
संचालक
श्री. सुनिल मदनकर
संचालक
श्री. सचिन चिंतावार
संचालक
श्री. गणेश तर्वेकर
संचालक
श्री. पियुष मुंगले
संचालक
श्री. लोकेश कोकाटे
संचालक
सौ. पुष्पलता बोरकर
संचालिका
सौ. परिणीता खोबरागडे
संचालिका
श्री. अरुण राऊळकर
तज्ञ संचालक

safeage
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

Our Certificates

ISO 14001 : 2004

IS 5244 : 2014 CM/L-7500087614

IS 550 : 2014 CM/L-3978088

IS 11188 : 2014 CM/L-2870669

ISO 9001 : 2008



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

**Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.**

**Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur**

**We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,**

# सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
# महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**




# सहकार महर्षी

**सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

**सहकार महर्षी ग्रंथ - प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)**

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | - | रु. १५००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | - | रु. १३५०/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | - | रु. १२००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

**UPI ID SahakarSugandha@SBI**
सोबत दिलेला **QR** कोड स्कॅन करून ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**

# AURO®

SINCE 1948

ISO CERTIFIED
ISO
ISO 9001 : 2008

BIS Certified

IS : 550 CM/L.No.7200069405
IS : 550 CM/L.No.3740863
IS : 550 CM/L.No.2863066
IS : 550 BIS Certified



## SALES & SERVICES

# ALL MAHARASHTRA REGION

CASH SAFE I GOLD SAFE I VAULT I LOCKER CABINET
JEWELLER'S SAFE I PETROL PUMP SAFE

Our trusted partners for 75 years

## Contact : Mrs. Suvarna Kshirsagar

Office Address : 1453, Shop No. 06, Shiv Parvati Society, Behind Janata Sahakari Bank. Khadilkar Path, Bajirao Road, Shukrawar Peth, Pune -411002

mtc1506pune@yahoo.com www.aurombica.com

7559283467 I 9685061515 I 9879791521


तुमच्या आर्थिक प्रवासासाठी,
प्रत्येक टप्प्यावर आमची साथ !
महिला उडान
निवेश योजना
सर्वोत्तम व्याजदर
10.25%*
किमान गुंतवणूक 10,000/-
कालावधी 555 दिवस
ज्येष्ठ नागरिकांसाठी 0.50% अधिक व्याजदर
*फक्त सभासदांकरिता *नियम व अटी लागू.
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org

Registered - SAHAKAR SUGANDHA - RNI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Reg. No. : MSD/057/2025
(Publication Date - 05/04/2025) Posting on 07/04/2025 Posting at Magazine Post, Mumbai PSO, Mumbai 400 001


# गुढीपाडवा प्रित्यर्थ
## हार्दिक शुभेच्छा !

DEPOSITS OVER 2400 CRORES+ | 4500+

• मुदत ठेव (F.D.) योजना •

| गुंतवणूक कालावधी | व्याजदर |
|---|---|
| 30 ते 45 दिवस | 7.00% |
| 46 ते 180 दिवस | 8.00% |
| 181 ते 365 दिवस | 9.00% |
| 366 दिवसांहून अधिक | 10.00% |




2 वर्षापेक्षा जास्त 1 लाखावर मिळवा ₹ 900/-

2 वर्षापेक्षा कमी 1 लाखावर मिळवा ₹ 850/-

90 महिन्यात दाम दुप्पट
455 दिवस 10.00%

■ वैयक्तिक कर्ज ■ मुदत ठेव योजना ■ आवर्त ठेव योजना
■ पर्यटन कर्ज ■ व्यवसाय कर्ज ■ गृहकर्ज

**प्राईड ऑफ महाराष्ट्र पुरस्कार**
द्वारा महाराष्ट्र इंडस्ट्रीयल अँड इकॉनॉमिकल डेव्हलपमेंट अँड एस.एम.ई. चेंबर्स ऑफ इंडिया

**प्रतिबिंब पुरस्कार**
द्वारा सहकार सुगंध, पुणे

**दीपस्तंभ पुरस्कार**
२०१६-१७,१७-१८,१८-१९,१९-२०,२०-२१, २१-२२,२२-२३ द्वारा राज्य फेडरेशन, महाराष्ट्र राज्य

**अर्थरत्न पुरस्कार**
द्वारा सह्याद्री उद्योग समूह, अहमदनगर

**बँको पुरस्कार**
१५-१६,१६-१७,१७-१८,१८-१९,१९-२०, २०-२१, २१-२२ द्वारा अविज् पब्लिकेशन, कोल्हापूर

**सहकार गौरव पुरस्कार**
२१-२२,२२-२३ द्वारा फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटीज लिमिटेड

**राष्ट्रीय पुरस्कार-बेस्ट को-ऑप.सोसायटी**
२१-२२,२२-२३ द्वारा बँक ऑफ इंडियन मायक्रो स्मॉल अँन्ड मिडीयम इंटरप्राईजेस

**सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार**
२०२२ द्वारा मल्टिस्टेट फेडरेशन, पुणे

**धनंजय तांबेकर**
व्यवस्थापकीय संचालक, गोदावरी अर्बन
संचालक, नॅफकब

**सौ. राजश्री हेमंत पाटील**
अध्यक्ष,
गोदावरी अर्बन

# गोदावरी अर्बन
मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि. नांदेड
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगाना, गुजरात, गोवा
Follow us on : www.godavariurban.com

मुख्यालय : 'सहकारसूर्य' एमएसईबी समोर, तरोडा नाका, पूर्णा रोड,नांदेड-४३१६०५.फोन:०२४६२-२६७२७७, ७७७५००५७७७
Email : officeadmin@godavariurban.com
प्रशासकीय कार्यालय : रिजेंट चेंबर्स, पहिला मजला, स्टेटस हॉटेलच्या वर, नरीमन पॉईंट, मुंबई -४०००२१

विश्वास तुमचा, जबाबदारी आमची!


**प्रेषक :**
**सहकार सुगंध कार्यालय**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,
५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा,
सिंहगड रोड, पुणे - ४११०३०.
मो. : ८८०५९८१६७३

**प्रति,**